शुक्रवार, ०६ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१३९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी



● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 06 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-139 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# महिला आयोगही बेफाम झाला का ?

## चित्रा वाघ यांचा चाकणकरांवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : 'बिग बॉस' फेम उर्फी जावेद परिधान करत असलेल्या तोकड्या कपड्यांच्या मुद्द्यावरून भाजपा नेत्या चित्रा वाघ आक्रमक झाल्या आहे. याप्रकरणी मुंबई पोलिसांकडे उर्फी जावेदवर कारवाई करण्याची मागणी केली. यावरून चित्रा वाघ यांनी महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना लक्ष्य केलं होतं. मुंबईतल्या भर रस्त्यात उर्फीच्या या शरीरप्रदर्शनाचं जे अतिशय बिभत्स आहे. महिला आयोग समर्थन करतंय का?, असा सवाल चित्रा वाघ यांना विचारला होता. यावरून रुपाली चाकणकर यांनी पलटवार केला होता.**




प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य आहे. त्यामुळे कोणी काय कपडे घालावेत हा ज्याचे त्यानं ठरवायला हवं. त्यातूनही कुणी काय कपडे घातले याचा इतिहास काढला, तर फार मोठी यादी समोर येईल. त्यावर त्यांनाही उत्तरं द्यावी लागतील. तेव्हा कपडे परिधान करण्याचं स्वातंत्र्य द्यायला हवं. एखादा पेहराव ठराविक व्यक्तींना अश्लील वाटत असेल, पण इतरांना तो अश्लील वाटत नसतो. त्यामुळं आयोग अशा बाबतीत वेळ वाया घालवू शकत नाही, असे प्रत्युत्तर रुपाली चाकणकर यांनी चित्रा वाघ यांना प्रत्युत्तर दिले होते. यावरून आता चित्रा वाघ यांनी रुपाली चाकणकरांवर टीकास्त्र सोडले आहे. आयोगाचे काम महिलांचा सन्मान जपणे, मान राखणे आहे. मग, उघड्या, नागड्या फिरणाऱ्यांना आयोगाला जाब विचारु वाटला नाही. कारण, त्यांना वेळ वाया घालवायचा नाही. मग, वेळ कशासाठी घालवायचा आहे. एखादी महिला मुंबईत उघडी-नागडी फिरत आहे. समाजमाध्यमांत अश्लील, घाणेरडे व्हिडीओ व्हायरल होत असताना सुमोटो दाखल करुन कारवाई का केली नाहीत. यासाठी महिला आयोगाला वेळ नसेल तर, मग त्या पदावर बसण्याचा कोणाला अधिकार नाही, असा घणाघात चित्रा वाघ यांनी केला आहे. उर्फीबरोबर महिला आयोग सुद्धा बेफाम झाले आहे का? ट्वीटरवर आलेल्या बातमीची दखल घेऊन महिला आयोगाने वेब सीरीजच्या अभिनेत्री आणि दिग्दर्शकाला नोटीस बजावली होती. या वेब सीरीजच्या पोस्टरमुळे धुम्रपानाचे समर्थन आणि अंगप्रदर्शन होत असल्याने कारवाई करण्यात आली. मग येथे तर लाईव्ह शो सुरु आहे. ट्वीटरच्या बातमीची दखल घेणारे महिला आयोग मुंबईच्या रस्त्यावरील चाललेल्या नंगानाचची दखल घेऊ शकत नाही का?, असा सवाल चित्रा वाघ यांनी उपस्थित केला आहे.

**माझा नंगानाच सुरूच राहील :** मॉडेल आणि अभिनेत्री उर्फी जावेद काही दिवसांपासून एक वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. भाजपा नेत्या चित्रा वाघ व उर्फीमधील वाद संपायचं काही नाव घेत नाही. "असा नांगनाच आम्ही महाराष्ट्रात चालू देणार नाही." असं म्हणत चित्रा वाघ यांनी उर्फीवर टिका केली. चित्रा वाघ यांनी पोलिसांत उर्फीविरोधात तक्रारही दाखल केली होती. शिवाय उर्फीनेही चित्रा वाघ यांना उत्तर दिले होते. आता तिचा आणखी एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओ तिने नंगानाच सुरूच राहील, असे म्हटले.

# निवडणुका घेण्याची हिंमत नाही : आदित्य

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आदित्य ठाकरे यांनी गुरुवारी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार हल्ला चढवला. आदित्य ठाकरे यांनी निवडणुका घेण्याचे खुले आव्हानही सत्ताधाऱ्यांना दिले. महापालिकेच्या निवडणुका घ्या, तसेच विधानसभेच्या निवडणुका घ्या. पण यांच्यात निवडणुका घेण्याची हिंमत नाही, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

नवीन वर्षात तरी या गद्दार सरकारने ४० गद्दार आमदारांच्या आणि १३ खासदारांच्या जागी निवडणुका घेण्याची हिंमत दाखवावी, असं आदित्य ठाकरे पुढे म्हणाले. आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला. बेकायदेशीर मुख्यमंत्री स्वतःच्या कामासाठी दिल्लीत जातात, गुवाहाटीला जातात. पण राज्यासाठी कधी गेले नाहीत.

आपल्याकडे एक सीएम आणि दुसरे सुपर सीएम आहेत, असा खोचक टोलाही आदित्य ठाकरे यांनी लगावला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा टोला लगावला. आदित्य ठाकरे यांनी महानगरपालिका संदर्भात गंभीर मुद्दा मांडला. स्थायी समितीने १७०० कोटींची कामे मंजूर केली होती. मात्र ही कामे आयुक्तांनी बदलली. ही कामे आयुक्त अशी बदलू शकतात का? यावर काम सुरू आहे. खरोखर ७ हजार कोटीची कामे होऊ शकतात आणि जर होत असतील तर मग कल्याण, नागपूरला रस्ते का नाही झाले?, यावर आमचा अभ्यास सुरू आहे. यावर कायदेशीरबाबी पडताळणी करत आहोत, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

# भारतीय मुस्लीम पर्सनल बोर्डावर जावेद अख्तर यांचा हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अफगाणिस्तानात तालिबानने ताबा घेतल्यावर महिलांवरचे अत्याचार वाढत आहेत. २१ डिसेंबर २०२२ ला तालिबानान्यांनी महिलांच्या आणि मुलींच्या विद्यापीठात जाण्यावरही बंदी घातली. अफगाणिस्तानच्या या निर्णयावर अनेक मुस्लिम देशांनी आक्षेप नोंदवला आहे. हाच मुद्दा पुढे करत प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांनी मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डला खडे बोल सुनावले आहेत.

गीतकार जावेद अख्तर म्हणतात तालिबान्यांनी इस्लामच्या नावे मुली, महिला यांच्या शाळा, महाविद्यालयं आणि विद्यापीठांच्या प्रवेशावर बंदी घातली आहे. एवढंच काय तर महिलांना नोकरी करण्यापासूनही रोखण्यात आलं आहे. भारतातलं मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड आणि इस्लामिक विद्वान हे याच्याशी सहमत आहेत का? त्यांच्यापैकी कुणालाच या घटनेचा निषेध नोंदवावा असं वाटत नाही? असा प्रश्न जावेद अख्तर यांनी विचारला आहे. जावेद अख्तर यांचं हे ट्विट सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे. काही युजर्सनी जावेद अख्तर यांना उत्तर दिलं आहे. तरी काही जणांनी जावेद अख्तर यांच्या या ट्विटचं समर्थन केलं आहे. जावेद अख्तर यांच्या ट्विटवर फिल्ममेकर अशोक पंडित यांनी उत्तर दिलं आहे. अशोक पंडित म्हणतात, "जावेद साहेब यांनी (मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड) यांनी आत्तापर्यंत काय केलं आहे? आणि यांच्याकडून काय अपेक्षा ठेवता? हे लोक म्हणजेही एक जमातच ना. राजौरीमध्ये काही दिवसांपूर्वी हिंदूंची हत्या झाली होती. त्यामुळे सगळ्या देशाचा थरकाप उडाला होता. मला अपेक्षा होती की तुम्ही त्यांच्याबद्दलही एक ट्विट करून सहवेदना तरी दर्शवली असती का?" असा प्रश्न अशोक पंडित यांनी विचारला आहे. @harsha9476 या ट्विटर युजरने जावेद अख्तर यांना उत्तर दिलं आहे की हे लोक असंच सगळं निर्माण करू पाहात आहेत एवढंच नाही तर हिजाबचं समर्थन करत आहेत. @ hajeetsood नावाचा एक युजर म्हणतो जावेदजी तुम्हाला दुसऱ्या देशाची खूप चिंता वाटते आहे. आपल्या देशात वेगळे काय होते आहे? हिजाबचं तुम्ही समर्थन करता का? त्याबाबत तुम्ही तोंड कधी उघडणार? अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने डिसेंबर महिन्यात एक फतवा काढला आहे. या फतव्यानुसार आता या देशात राहणाऱ्या महिलांच्या शिक्षणाच्या आणि नोकरीच्या अधिकारावर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे अफगाणिस्तानात राहणाऱ्या महिलांना, मुलींना शिक्षण घेता येणार नाही तसेच नोकरीही करता येणार नाही. विविध विद्यापीठांमध्ये जे शिकवले जाते आहे ते इस्लामविरोधी आहे म्हणून आम्ही हा फतवा काढल्याचे तालिबानच्या उच्च शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.


# मुकेश अंबानी देणार अदानींना टक्कर


आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई:** मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांनी आपली कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वकाही आपल्या मुलांवर सोपवले आहे. त्यांनी आधीच आपला व्यवसाय आपल्या तीन मुलांमध्ये विभागला आहे. मोठा मुलगा आकाश अंबानी याच्याकडे टेलिकॉम व्यवसायाची कमान सोपवण्यात आली आहे तर रिटेल व्यवसायाची जबाबदारी मुलगी ईशा अंबानीकडे सोपवण्यात आली आहे. तर लहान मुलगा अनंत अंबानी याच्याकडे तेल शुद्धीकरण आणि पेट्रोकेमिकल्सचा व्यवसाय देण्यात आला आहे. यानंतर आता मुकेश अंबानी काहीतरी नवीन करण्याचा पुन्हा विचार करत आहेत. ब्लूमबर्गच्या रिपोर्टनुसार, ६५ वर्षीय मुकेश अंबानी आता हरित ऊर्जेवर आपले लक्ष केंद्रित करणार आहेत. अंबानी यांनी गेल्या वर्षी जाहीर केले होते कि त्यांची कंपनी ग्रीन एनर्जी व्यवसायात पुढील १५ वर्षांत तब्बल ७५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करेल. रिलायन्सने २०३५ पर्यंत कार्बन नेट-झिरो कंपनी बनण्याचे लक्ष्य समोर ठेवले आहे. या अहवालात सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, मुकेश अंबानी हरित ऊर्जेशी संबंधित कंपनीची रणनीती पाहतील. यामध्ये गिगा कारखाने आणि ब्लू हायड्रोजन सुविधांचे बांधकाम समाविष्ट आहे. अधिग्रहणाद्वारे कंपनीचा विस्तार होईल. तसेच संभाव्य गुंतवणूकदारांशी चर्चाही केली जात आहे. अंबानी हे कोणत्याही प्रकल्पावर मनापासून काम करण्यासाठी ओळखले जातात. १९९० मध्ये त्यांनी पेट्रोलियम व्यवसायासाठी रात्रंदिवस काम केले. यानंतर गेल्या दोन दशकांत त्यामनी आपला पूर्ण जोर टेलिकॉम व्यवसायावर दिला होता.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# खाणाऱ्याने खात जावे ...

आधुनिक केसरी

परवाच्या दिवशी एका लग्नासाठी मिरजेला जावे लागले. घरचेच लग्न असल्याने लग्नस्थळी सीमांतपूजनापासून हजर होतो. गेल्या गेल्या स्वागताला उपीट आणि चहाचा मेनू हजर होता. आता तुम्ही म्हणाल की उपीट आणि चहा यात काय विशेष ? पण जेव्हा गरमागरम उपीट खाऊन पाहिले तेव्हा मजा आली. मग काही खवैय्यांनी त्याचा पुन्हा आस्वाद घेतला. यातच बनवणाऱ्याचे यश सामावले आहे ! तुम्ही काय देता यापेक्षा कसं देता याला जास्त महत्व आहे. शिवाय स्वच्छ जागा आणि परिसर, स्वच्छ डिशेस, चमचे, वाट्या इ गोष्टी पण त्यात भर घालतात. उपीट किंवा उपमा साध्या रव्यापासून बनवला जाणारा पदार्थ. पण त्याला ताजा कढीपत्ता, बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर, शेंगदाणे इ ची सुरेख जोड दिली की क्या कहने ! मग देणारा देतो आणि खाणारा खातो. ' आज काय स्पेशल ' या टीव्ही शोमध्ये अस्सल आणि रसिक खवैय्या असलेला प्रशांत दामले म्हणतो, ' जगण्यासाठी जेवढा श्वास महत्वाचा, तेवढेच जगण्यासाठी अन्नाचा चविष्ट घासही महत्वाचा आहे. ' उपीट नंतर झकास चहा झाला. मैफलीत एखाद्या गाण्याचा छान सूर लागावा, मग श्रोत्यांनी त्यात रंगून जावे आणि गाणे केव्हा संपले ते कळू नये असेच जणू जेवणाचा मेनू उत्तम असला की होते. अशी संध्याकाळची छान सुरुवात झाली. जणू ' ये शाम मस्तानी...' त्यात छान पावसाळी हवा ! दुसऱ्या दिवशीची सकाळ वडा सांबाराच्या चविष्ट आणि गरमागरम नाश्त्याने झाली. हाही मेनू झकास जमला होता. खवैय्यांनी यावर मस्त ताव मारला. सांबार तर इतके चविष्ट झाले होते की काहींनी नंतर नुसते सांबार घेऊन त्याचा आस्वाद घेतला. दुपारच्या जेवणाचा मेनूही असाच मस्त. पोळ्या, पुऱ्या, साधा भात, मसाले भात, भोपळ्याचे भरीत, बुंदीचे रायते, गरम भजी, पनीर वाटाणा भाजी, बटाटा भाजी आणि जोडीला चविष्ट फ्रुटखंड ! मग काय मैफलच रंगली. हे सगळे बनवणाऱ्या बल्लवाचार्यांचे कौतुक केल्यावाचून राहवले नाही. आदल्या दिवशी संध्याकाळच्या उपम्यापासून जो काही सूर लागला होता, तो जेवणाच्या भैरवीने संपला. सगळेच तृप्त होऊन बाहेर पडले. **क्रमश :**





# आनंदी पहाट

## आनंदाचा शोध आपल्याच अंतरंगात घ्यावा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपलं जीवन जगण्याच्या अनेक प्रकारच्या नवनवीन कल्पना आपल्या मनांत सदोतीत येत असतात. प्रत्येकालाच असं वाटत असतं कि, आपलं आयुष्य इतरांपेक्षा निराळं असावं. जगानं आपलं कौतुक करावं, असंच आपलं जीवन असावं. आपल्या प्रत्येक बाबतीत काही-ना-काही वेगळेपण असावं, असं अनेकदा आपल्याला वाटत असतं. इतरांपेक्षा आपली प्रत्येक गोष्ट भिन्न असण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असते. त्यासाठी बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा स्विकार करावा लागत असतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. ह्या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगानं सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या विचारांत सकारात्मकता असतेच असे नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणं आवश्यक असतं. मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. तेव्हाच आकर्षणाच्या सिद्धांताचं शास्त्र काम करायला लागतं. ह्या शास्त्राचा नीट वापर केला नाही तर मात्र त्याचे काही जणांच्या बाबतीत विपरीत परिणाम देखील होत असल्याचं स्पष्ट झालं आहे. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असते. खरं तर आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. दिवसभरांत एकूण सत्तर हजार विचार आपल्या अंतर्मनांत निर्माण होत असल्याचं विज्ञानाच्या प्रयोगांतून स्पष्ट झालं आहे. त्या विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही.



आधुनिक केसरी

**प्रकटे पाषाणी | जनी संगे |||**

ज्ञानास येऊ दे | प्रचितीचा गंध ||
जाण तो सुगंध | चंदनाचा ||१||
बोलणी करणी | एकरूप ज्याची ||
खाण आदर्शाची | राम जाण ||२||
ज्ञानाचिये ठायी | विनय शोभतो ||
अहंकार खातो | उभ्या जन्मा ||३||
मानपान सारे | मनाचे आभास ||
मृगजळी भास | काय कामी ? ||४||
अनुभवी वाचा | शुद्ध संतवाणी ||
प्रकटे पाषाणी | जनी संगे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरूपण

आधुनिक केसरी

**भेटतील तुमच्यावर जळणारे, पण लक्षात असू द्या- त्यांना प्रतिक्रिया द्याल तर त्यांचे उद्दिष्ट तुम्हीच सफल करीत आहात.**

**सतत, दीर्घ काळ, न थकता गुणवत्ताप्रधान कार्य करणे हे जगातील सर्वश्रेष्ठ व्रत आहे. हे व्रत शत्रुदमनार्थ वज्रासारखे उपयोगी आहे.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# स्वर्वेद

आधुनिक केसरी

**अनेक जन्म दुख मरण के, त्रास वासना लाग ।**
**अभिनिवेश ताको कहूँ, सुनु नाशक अनुराग ।।२४९।।**
**परम विहंग समाधि में, अनुभव शब्द प्रकाश ।**
**जीवन्मुक्ती होइ सो, पंच क्लेश ता नाश ।।२५०।। (स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/२४९, २५०**



अनेक जन्मांमध्ये अनुभवलेल्या जन्म- मृत्यूच्या यातनांचे भय जे आत्म्यामध्ये वर्तमान असते, त्यास अभिनिवेश असे म्हणतात; जे प्रेम-नाशक आहे. मृत्यूच्या भयाने कुठलाही प्राणी मरू इच्छित नाही. प्राकृतिक दुःखं असूनही त्याचे आपल्या शरीरावर प्रेम असते. म्हणून हे भय शुद्ध चेतन प्रेम नष्ट करणारे आहे. विहंगम योगाच्या सर्वोच्च विज्ञानाद्वारे समाधी अवस्थेच्या प्राप्तीने शब्द ब्रह्माचा अनुभव होतो. त्यामुळे जीवन्मुक्त अवस्थेची उपलब्धता होते, जी सर्व क्लेशांना नष्ट करणारी आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# हरिपाठ

आधुनिक केसरी


***देवाचिये द्वारीउभाक्षणभरी। तेणें मुक्तीचारीसाधियेल्या ।।१।।***
***हरीमुखे म्हणाहरीमुखे म्हणा। पुण्याचीगणनाकोणकरी।।२।।***
***असोनिसंसारीजिव्हे वेगु करी।***
***वेदशास्त्रउभारीबाह्यासदा।।३।।***
***ज्ञानदेवम्हणें व्यासाचियाखुणा।***
***द्वारकेचाराणापांडवाघरी।।४।।***

**अर्थ :** देवाच्या दारात क्षणभर उभे राहिल्याने चारही मुक्तींचा लाभ होतो. तेव्हा मुखाने तुम्ही 'हरि' 'हरि' असे नाम उच्चारा. त्यामुळे प्राप्त होणाऱ्या पुण्याची गणना कोण करु शकणार? तुम्ही आपल्या जिव्हेने हरिनाम उच्चारण्याची त्वरा करा, मग तुम्ही संसारात असलात तरी चालेल, असे वेदशास्त्र सतत हात उंचावून सांगत आहे. ज्ञानदेव महर्षी व्यासांना अनुसरुन हे सांगत आहेत. व्यासांनी महाभारतात भगवंतांचे सर्वदा स्मरण करणाऱ्या पांडवांच्या घरी द्वारकाधिश भगवान श्रीकृष्ण वास्तव्य करीत होता, असे सांगितले आहे. असे श्रेष्ठ सौख्य नामधरकास लाभत असते.

**विवरण :** महाराष्ट्रातभागवतधर्माची मुहूर्तमेढसंतज्ञानेश्वरांनी रोवली, आणिम्हणूनच "ज्ञानदेवें रचिलापाया, तुका झालासे कळस" असे म्हटले जाते. घर बांधताना आधी पाया खणला जातो, मग पाया बांधला जातो. जितकी इमारत उंच त्याप्रमाणात पायाचा आकारआणि खोली ठरवली जाते. मागील ७००वर्षही 'इमारत' दिमाखात उभी आहे आणि जगाला ज्ञान देण्याचे, परंपरा टिकविण्याचे असिधाराव्रतचालू आहे, म्हणजे हा पायाबांधणारा अभियंताकितीकुशलअसेल. आपल्याकडे सर्वसंतांना स्वाभाविकपणेचआईचीउपमादिलीगेली आहे. आईइतकेच नव्हे, तर त्यापेक्षा खूप जास्त सर्वसंतांचे आपल्यावर उपकार आहेत. आई लेकराला एक जन्म सांभाळते, तर सद्‌गुरू शिष्याला मुक्तीमिळवून देईपर्यंत सांभाळतात. भक्त आणिदेव यांच्यातील ऐक्य साधणारा दुवाकोणताअसेल तरते संत. एखाद वेळेसदेवप्रसन्नहोणार नाही, पण संतांनामात्र मायेचापाझरलगेच फुटतो. सर्वसंतांनीअपारकष्टसोसले, अनेक संतांना समाजाचे हीत व्हावे म्हणून मानहानी पत्करली, समाजाकडून त्यांची हेटाळणी झाली, कोणाचा संसार विस्कटला, कोणाला वाळीत टाकण्यात आले, कोणाची गाढवावरुनधिंडकाढण्यात आली. परंतु या कृतीचे प्रतिबिंब कोणत्याही संतांच्या साहित्यात आपल्याला आढळत नाही आणि पुढेही आढळणार नाही. कारण संत म्हणजे अकृत्रिम मातृभाव आणि वात्सल्य यांचे आगर.**क्रमशः**

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी



**मना सर्वही संग सोडूनि द्यावा।**
**अती आदरे सज्जनाचा धरावा।**
**जयाचेनि संगे महा दुःख भंगे।**
**जनी साधनेवीण सन्मार्ग लागे।।२०३।।**

**श्लोकार्थ :** मना ! जीवनामध्ये सर्व इतरांची संगत सोडून दे आणि मनापासून संत संगत कर. संतसंगतीने जीवनातील सारी दुःखे नाश पावतात आणि साधनांचे कष्ट न होता आत्मदर्शनाचा मार्ग लाभतो.

**विवेचन :** आत्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर स्वस्थ न बसता सत्संगात रहावे असे समर्थांनी मागील श्लोकात सांगितले. प्रारब्धाने आलेली सुखदुःखे मनुष्याने आनंदाने भोगावी असे समर्थ आपल्याला सांगत आहेत. संतसंगतीने प्रारब्धाचा जोर कमी होत असतो. सर्व संतांनी सामान्य मनुष्याला सगुण भक्तीचा मार्ग दाखविला. सद्‌गुरू शिष्याचा हात धरतात आणि त्याला भगवंताचे दर्शन घडवितात. संतांच्या संगतीत भगवंताची स्मृती जागृत रहाते. त्या स्थितीत नित्य स्मरणात असलेले नाम अमृताहूनी गोड वाटू लागते. मग संत नामदेव महाराज म्हणून जातात, "अमृताहुनी गोड नाम तुझे देवा" आईच्या कुशीत असताना बाळाला कसलीच भीती वाटत नाही, ते सुखाने झोपी जाते. भगवंताच्या संगतीत असताना, नामाच्या संगतीत असताना भक्ताचे असेच होत असते. आत्यंतिक सुखाची प्राप्ती आणि दुःखाची पूर्णपणे निवृत्ती हे प्रत्येक मनुष्याचे ध्येय असते. संतांच्या संगतीने मनुष्य यामध्ये यशस्वी होऊ शकतो, असे सर्व संत सांगतात. बरेच दिवसांपूर्वी मा. विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या एक प्रवचनात ऐकलं होत की "मनुष्याने जगातील सर्व संग सोडून द्यावे आणि एकच संग धरावा, तो म्हणजे सत्संग किंवा संतसंग" *. या एकाच वाक्यात पूर्ण श्लोकाचे विवेचन आले आहे. एखाद्याला आत्मज्ञान झाले म्हणून त्याची आणि त्याच्या देहाची संगती सुटत नाही, म्हणून आहे त्या देहाबद्दल आसक्ती न ठेवता मनुष्याने आपले साधन चालू ठेवावे.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

भागवतात संत एकनाथ महाराज सांगतात, गोप गोपींनी कोणती विशिष्ठ साधना केल्याचे ऐकिवात नाही. त्यांनी एकच केले, त्यांनी श्रीकृष्णाला आपल्या मनात दडवून ठेवले. गोप गोपी नित्य भगवंताच्या अनुसंधानात राहिल्या. भगवंताच्या सहवासात गोप गोपी असो वा इतर भक्त असोत, सर्वजण सुखदुःख विसरून जातात. त्याच्या संगतीने त्यांना मोक्ष प्राप्ती झाली.

यापरी शिणतां साधनेंसीं । माझी प्राप्ति नव्हे अतिप्रयासीं । ते गोपी पावल्या अप्रयासीं । सत्संगासी लाहोनी ॥ ( ना. भा. १२ १२१ )

{अशा प्रकारे साधनें करून थकले असतां अत्यंत प्रयासानेंही माझी प्राप्ति होत नाही. पण ती माझी प्राप्ति गोपी सत्संगाला प्राप्त करून घेऊन अनायासानें पावल्या.}

श्रीव्यंकटेशस्तोत्रात एक ओवी आहे. "समर्थाच्या घरचे श्वान | त्यासी सर्व देती मान||" * काहीच शक्य झाले नाही तर मनुष्याने श्वान व्हायला हरकत नसावी, फक्त त्याचा मालक समर्थ असावा. दैनंदिन व्यवहारात सुद्धा हाच अनुभव मनुष्य घेत असतो. उदा. Reliance किंवा Tata मधील कर्मचाऱ्यांची कोणत्याही बँकेतील पत रोजंदारी करणाऱ्या किंवा सामान्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांपेक्षा कितीतरी पटीने जास्त असते. श्रीगोंदवलेकर महाराज म्हणायचे की संतांच्या घरी नुसते पडून राहिले तरी आपले काम होईल. याचा अर्थ संतांनी सांगितलेले साधन डोळे मिटून करावे, आपल्या मनीचे त्यात घुसडू नये. संतांनी नाम घ्यायला सांगितले असेल तर फक्त नाम घ्यावे. आपली बुध्दी वापरून अन्य साधना करू नये. यात आपलेच नुकसान होत असते, हे ध्यानी ठेवावे. आपल्या कडे एक छान म्हण आहे, "गुरू सांगेल ते करावे, गुरू करेल ते करू नये." अशा सद्‌गुरुंचे, संतांचे वर्णन करायला शब्द कमी पडतात. समर्थ म्हणतात "आता सद्‌गुरु वर्णवेना । जेथे माया स्पर्शु शकेना । ते स्वरुप मज अज्ञाना । काय कळे ।।" संत म्हणजे सद्‌गुणांची खाण !! संत म्हणजे चालते बोलते विद्यापीठच !! त्यातील एक गुण जरी आपण घेऊ शकलो , तरी आपल्या आयुष्याचे सोने होईल. संतांनी लिहिलेल्या ग्रंथाद्वारे भक्तांना संतांचा सहवासाचा लाभ होऊ शकतो.

# गावांमध्ये उद्योगाचे जाळे पोहचले तर स्थलांतर थांबेल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : -ॲडव्हांटेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३ चे शानदार उद्‌घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार हे सर्वसामान्य माणसांचे सरकार असून राज्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी कटीबद्ध आहे. केवळ वजनदार नेत्याच्या दबावाखाली प्रकल्प देण्याऐवजी जेथे गरज आहे तेथे प्रकल्प देण्याकडे सरकारचा कल आहे. राज्याच्या विकासात शेती एवढीच उद्योगाचीही महत्त्वाची जबाबदारी आहे. शेतकरी आपल्याला जगवितो. तर उद्योग आपल्याला संपन्न करतो. यामुळे उद्योगांचे जाळे शहरी भागापुरते मर्यादीत न राहता ग्रामीण भागापर्यंत पोहचले पाहिजे. तसे झाल्यास रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहराकडे होणार स्थलांतर थांबू शकेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मराठवाडा असोसिएशन ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या (मसिआ) वतीने ५ ते ८ जानेवारी दरम्यान आयोजित राज्यातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन 'ॲडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३' च्या उद्‌घाटना प्रसंगी ते व्हिडीओ कॉन्फरन्सिंगवर बोलत होते. तत्पूर्वी केंद्रिय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड आणि राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. याप्रसंगी कॅबीनेट मंत्री अतुल सावे, संदीपान भुमरे, अब्दुल सत्तार, आमदार प्रदीप जैस्वाल, उदयसिंग राजपूत, प्रा.रमेश बोरणारे, हरीभाऊ बागडे, खासदार इम्तियाज जलील, उद्योग खात्याचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, ऑरीकचे एमडी सुरेश काकाणी, मसिआचे अध्यक्ष किरण जगताप आदींची उपस्थिती होती. शेंद्रा एमआयडीसीतील ऑरीक सिटीमध्ये ५ ते ८ जानेवारी २०२२ दरम्यान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मसिआ संघटनेने राज्यातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन भरवले आहे. मसिआने हे दाखवून दिले की असे प्रदर्शन केवळ मुंबई-पुण्यातच होत नाहीत, तर मराठवाड्यातही हे शक्य आहे. हे प्रदर्शन अशावेळी होत आहे जेव्हां डिसेंबरमध्ये महाराष्ट्राने उत्पादनाचा उच्चांक गाठला आहे. वस्तुंची मागणी वाढली आहे तर रोजगार निर्मितालाही वेग आला आहे. यामुळे उद्योग जगतात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. महा एक्स्पोमुळे केवळ कोट्यवधीची उलाढालच होणार नसून मराठवाड्यातील उद्योजकांच्या मालाला देश-विदेशात संधी मिळणार आहे. पंतप्रधान मोदींचे आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने असे एक्स्पो महत्त्वाचे ठरतात. उद्योग उभे रहावे, वाढावे व त्यातून रोजगार निर्मिती व्हावी, ही सरकारची जबाबदारी आहे. यामुळेच स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवी वर्षात ७५ हजार रोजगार निर्मितीचे उद्धिष्ट ठेवण्यात आले आहे. तर नुकतेच ७० हजार कोटीच्या उद्योगांना कॅबीनेटच्या सबकमिटीने मंजुरी दिली आहे.

# आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी...

## दर्पण दिन विशेष : ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत जयप्रकाश दगडे यांचा आधुनिक केसरीशी खास संवाद

आधुनिक केसरी

**औरंगाबाद : प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता शून्यावर येऊन ठेपली असल्याची चर्चा मध्यंतरी एका परिसंवादाच्या निमित्तानं सोलापूर येथे रंगली होती. मराठी मुद्रित व दृकश्राव्य माध्यमातील काही विश्लेषक त्यात सहभागी होते. त्यांनी परिसंवादात जो सूर व्यक्त केला, त्यावर आत्मचिंतन करणे तर दूरच , पत्रकारांनी उच्छृंखल प्रतिक्रिया देत टरच उडविल्याचे मला नंतर जाणवत राहिलं. पत्रकार म्हणून यानिमित्ताने माझ्या मनात आलं, ' आपुलीच प्रतिमा होते आपुलीच वैरी ' असं काही आपलं- म्हणजे पत्रकारांचं- होत चाललंय् की काय ? अशी खंत जेष्ठ पत्रकार आणि विचारवंत जयप्रकाश दगडे यांनी दर्पण दिनानिमित्त खास आधुनिक केसरीशी संवाद साधताना व्यक्त केली.**




किमान आजच्या दर्पणदिनी तरी त्यावर लिहिलं, बोललं जाणं गरजेचं झालं आहे. मुळात, पत्रकारांनी जनतेची वकिली केली पाहिजे,न्यायासनावर बसून न्यायाधीशांची भूमिका घेता कामा नये, या मताचा मी आहे. प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता धोक्यात आल्याची हाकाटी पटणारी मंडळी कोण आहेत, हे पहिल्यांदा तपासून घेतलं पाहिजे. प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता टिकवून ठेवण्याची जबाबदारी केवळ संपादक व पत्रकार यांचीच आहे काय ? वृत्तपत्रांचा वाचक, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रेक्षक यांच्यासह मालकवर्गाचीही ती नाही काय ? जे खपतं, तेच विकलं जातं या न्यायानं ज्याला सर्वाधिक वाचक अथवा प्रेक्षकवर्ग मिळतो अशाच बातम्या द्याव्या लागतात, या वास्तवाकडं डोळेझाक कशी करायची ? शेतकरी आत्महत्यांसारख्या प्रश्नांवर वृत्तपत्रांनी आवाज उठविला होता. जर ' स्क्रिप्टेड शो ' असेल, तर त्याची विश्वासार्हता धोक्यात येणारच. विवेकाला शाबूत ठेवणं गरजेचं आहे. आज पॅकेजमध्ये पत्रकारिता गुदमरत चालली आहे. या पार्श्वभूमीवर विश्वासार्हता टिकविण्यासाठी आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. तथापि विश्वासार्हता संपूर्ण संपलेली आहे, असं म्हणणं हा सत्याचा अपलाप होईल.अद्यापही मुद्रित माध्यमं विश्वासार्हता टिकवून आहेत.या माध्यमावर 62 टक्के विश्वास सर्वेक्षणाच्या माध्यमातून दर्शविण्यात आला आहे. पण पत्रकारांच्या योग्य भूमिकेला वाचकांनाही पाठिंबा दिला पाहिजे. इलेक्ट्रॉनिक मीडियातली सगळी गणितं टीआरपीच्या पिंगा घालत असतात. त्यांची परिभाषा वेगळी असते. जे प्रेक्षकांना बघायला आवडते , तेच दाखविले जाते. आजकाल सिटीजन जर्नालिझम नावाचा एक नवा प्रवाहही पत्रकारितेत आला आहे. या सोशल मीडियाच्या काळात कोणीही पत्रकार होतो. त्यास विश्वासार्हता असतेच असे नाही. पण प्रेक्षकांमध्ये समाजभान येणे आवश्यक आहे. कारण शेवटी टीव्हीचा रिमोट त्यांच्याच हाती तर असतो. सारांश, प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता शून्यावर अजिबात आलेली नाही. फार फार तर उणे होत चालली आहे, असं म्हणता येईल आज पॅकेजच्या विश्वात पत्रकारिता हरवत चालली आहे, हे मात्र खरंच आहे. जाहिरातींचं महत्व दिवसेंदिवस वाढत चाललं आहे. संपादकीय विभागांच्या जाहिरात विभागाला अधिक भाव आलेला आहे. ( मराठीतील एक दिग्गज पत्रकार एकदा माझ्याशी गप्पा मारताना असं म्हणाले होते की, अग्रलेख फक्त 4 टक्के वाचक वाचतात, असं सर्वेक्षण आहे. मोठी जाहिरात आली की एखाद्या चांगल्या फीचरची गच्छंती अटळ !! ) सोशल मीडियाच्या आडून स्वतःची उदात्त इमेज निर्माण करू बघणाऱ्या भंपक पत्रकारांचंही हल्ली बरंच पेव फुटलेलं दिसतं. अशा प्रतिभाशून्यांचंही समर्थन केलं जातं, हे आणखी धक्कादायकच आहे ! समाजमाध्यमावरील अशा एकांगी समर्थनामुळं सामान्य माणसांचं मानसिक आरोग्य धोक्यात आलं आहे, हे कसं नाकारणार ? ही निरीक्षणं मनोविश्लेषकांनी कधीची नोंदवून ठेवली आहेतच ना. समाजमाध्यमावरील बऱ्याच पोस्ट्स ना मिळणारे ब्लाइंड रिस्पॉन्स अगतिक समाजस्वास्थ्यास कारणीभूत ठरतात. बरं, पोस्ट लोककल्याणाची की समाजात द्वेष निर्माण करणारी, याची खातरजमा करणारी यंत्रणा तरी अस्तित्वात आहे काय ? तर ती अजिबात नाही. न्यायव्यवस्थाही त्यापुढं जणू हतबल झालेली दिसते. असल्या पोस्ट्स टाकणाऱ्या हुजऱ्या पत्रकारांच्या टोळ्याही फोफावत चालल्या आहेत. त्यांचा एक सवतासुभा असलेला अजेंडाच असतो. राजकीय इच्छाशक्तीचा अभावामुळं समाजमाध्यमावरील हैदोसधुल्ला वाढतच चालला आहे. परंतु समाजहिताची ठोस भूमिका घेणाऱ्या विचारवंतांनी, समाजधुरिणांनी आणि पत्रकारांमुळंच देशात लोकशाही जिवंत आहे, हे मान्यच करावं लागेल. पत्रकारितेच्या विश्वाला हा एक सकारात्मक दिलासाच नव्हे काय ? असे ठाम मत जयप्रकाश दगडे यांनी शेवटी मांडले.



# प्रा. किशोर शिरसाट यांना पीएच.डी.पदवी

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** सरस्वती भूवन महाविद्यालयाच्या नाटयशास्त्र विभागाचे प्रमूख प्रा. किशोर शिरसाट यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या वतीने आंतर विद्या शाखेअंतर्गत नाटयशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. शिरसाट यांनी 'मराठवाडयाची रंगभूमी एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन केले आहे.

संशोधन मार्गदर्शक प्रा.जयंत शेवतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'मराठवाडयाची रंगभूमी एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर प्रा. किशोर शिरसाट यांनी प्रबंध सादर केला होता. प्रस्तूत विषयावर दि.31 डिसेंबर 2022 रोजी झालेल्या मुलाखतीव्दारे बाहय परिक्षक मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे विभाग प्रमूख डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या शिफारशीनुसार विदयापीठाने प्रबंध स्वीकारुन त्यांना पीएच.डी. प्रदान केली आहे. मराठवाडयातील रंगभूमीवर प्रा.किशोर शिरसाट यांनी मौलिक असे संशोधन केलेले आहे. येणाऱ्या पिढीला व संशोधकांना या प्रबंधाचा पथदर्शक म्हणून निश्चितच उपयोग होणार आहे. या संशोधना बद्दल व पीएच.डी. ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्याबद्दल लोकरंग प्रतिष्ठाणचे डॉ. दिलीप वाघ, ज्ञानेश्वर घोरपडे, दिलीप शिराळे, प्रा. नितीन गरूड त्याचबरेबर लातूर येथील जनरंग अकादमीचे अध्यक्ष दिनेश निलंगेकर, मिलींद सरवदे, रविंद्र हरबडे, बालाजी अजगरे, दिपरत्न निलंगेकर, धनंजय पवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. प्रा. शिरसाट यांच्या या यशाबदल त्यांना संशोधनासाठी मौलिक मार्गदर्शन करणारे प्रा. दिलीप महालिंगे, प्रा. किशोर यांच्या पत्नी सौ.सुनंदा शिरसाट व मित्र परिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे.






## जय शहांनी जाहीर केले कॅलेंडर

आधुनिक केसरी

आशिया चषक स्पर्धेसाठी गट फेरीची यादी जाहीर झाली आहे. भारत आणि पाकिस्तानचे संघ एकाच गटात आहेत. अशा परिस्थितीत सप्टेंबरमध्ये दोन्ही संघ पुन्हा एकदा आमनेसामने येणार आहेत. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर टी२० विश्वचषकात दोघांची शेवटची भेट झाली होती. त्यानंतर शेवटच्या चेंडूपर्यंत पोहोचलेला सामना टीम इंडियाने जिंकला. आशिया चषकाबाबत बोलायचे झाले तर गेल्या वर्षी दोन्ही संघांमध्ये दोन सामने झाले होते. पहिला सामना भारताने तर दुसरा सामना पाकिस्तानने जिंकला. टीम इंडिया सुपर-४ फेरीतून बाहेर पडली. त्याचवेळी श्रीलंकेने अंतिम फेरीत पाकिस्तानचा पराभव करून विजेतेपदावर कब्जा केला. आशिया चषक यावेळी पाकिस्तानात होणार आहे. तथापि, आशियाई क्रिकेट परिषदेचे (ACC) अध्यक्ष जय शाह यांनी गेल्या वर्षी ही स्पर्धा तटस्थ ठिकाणी खेळवली जाईल असे सांगितले होते. टीम इंडिया पाकिस्तान दौऱ्यावर जाणार नाही. त्यांच्या वक्तव्याचा पाकिस्तानने विरोध केला होता. त्यानंतर ही स्पर्धा कुठे खेळवली जाईल, याचा निर्णय अद्याप झालेला नाही. सध्या पाकिस्तान अधिकृत यजमान आहे. आशियाई क्रिकेट परिषदेचे (ACC) अध्यक्ष आणि BCCI सचिव जय शाह यांनी २०२३ आणि २०२४ मध्ये खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. ज्यामध्ये पुन्हा एकदा पाकिस्तान आणि टीम इंडिया यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. यासाठी टीम इंडिया पाकिस्तानच्या दौऱ्यावर जाऊ शकते. अखेर, काय आहे संपूर्ण बातमी, या रिपोर्ट्समध्ये जाणून घेऊया की एसीसीच्या सर्व मोठ्या टूर्नामेंट कधी आणि कुठे खेळल्या जातील. ही आशियाई क्रिकेट परिषद (ACC) आशियातील क्रिकेटला चालना देण्यासाठी स्थापन करण्यात आली. त्याची स्थापना १९८३ मध्ये दिल्लीत झाली. कृपया सांगा की यावेळी त्याचे अध्यक्ष बीसीसीआय सचिव जय शाह आहेत. २०२३ आणि २०२४ मध्ये खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेच्या वेळापत्रकाची माहिती शेअर करताना त्यांनी ट्विटरवर लिहिले की, "ACC Media1 २०२३ आणि २०२४ साठी मार्ग संरचना आणि क्रिकेट कॅलेंडर सादर करत आहे. या खेळाला नवीन उंचीवर नेण्यासाठी आमचे अतुलनीय प्रयत्न आणि तळमळ यातून दिसून येते. देशभरातील क्रिकेटपटू नेत्रदीपक कामगिरीसाठी तयारी करत असताना, हा क्रिकेटसाठी चांगला काळ असल्याचे आश्वासन देतो. आशिया चषक शेवटचा टी२० फॉरमॅटमध्ये झाला होता. २०१६ मध्येही असेच घडले होते. दोन्ही वर्षांच्या टी२० विश्वचषकामुळे हे घडले. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर यंदा फॉर्मेट बदलण्यात आला आहे. आता तो त्याच्या मूळ फॉरमॅटमध्ये खेळला जाईल. स्पर्धेच्या १६व्या आवृत्तीत सुपर ४ टप्पा आणि अंतिम फेरीसह एकूण १३ सामने होतील.

## जगातील सर्वोच्च रणांगणात प्रथमच महिला अधिकारी तैनात

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**आजच्या काळात महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. दरवर्षी मोठ्या संख्येने देशातील मुली भारताच्या रक्षणासाठी भारतीय सैन्यात सामील होतात. कॅप्टन शिवा चौहान अशीच एक मुलगी आहे जिने इतिहास रचला आहे. फायर अँड फ्युरी सॅपर्सच्या कॅप्टन शिवा चौहान कुमार या पदावर नियुक्त झालेल्या पहिल्या महिला अधिकारी ठरल्या आहेत. भारतीय लष्कराच्या फायर अँड फ्युरी कॉर्प्सच्या महिला अधिकारी कॅप्टन शिवा चौहान यांची जगातील सर्वात उंच युद्धभूमीवर नियुक्ती करण्यात आली आहे. कॅप्टन शिवा 15,632 फूट उंचीवर असलेल्या कुमार पोस्टवर कर्तव्य बजावत आहेत. भारतीय लष्कराने पहिल्यांदाच या धोकादायक पोस्टवर महिला अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.**

फायर अँड फ्युरी कॉर्प्सने ट्विट केले की कॅप्टन शिवा चौहान हे फायर अँड फ्युरी सेपर्स आहेत. कुमार पदावर नियुक्त झालेल्या त्या पहिल्या भारतीय महिला आहेत. हे जगातील सर्वात उंच युद्धभूमी आहे. कॅप्टन शिवाने या ठिकाणी पोस्टिंग करण्यापूर्वी कठोर प्रशिक्षण पूर्ण केले आहे. फायर अँड फ्युरी कॉर्प्सचे मुख्यालय लेहमध्ये आहे. ते लष्कराच्या उत्तर कमांडच्या अंतर्गत येते. ते चीन आणि पाकिस्तानच्या सीमेवर तैनात आहेत. तसेच ते सियाचीन ग्लेशियरचे संरक्षण करतात. फायर अँड फ्युरी कॉर्प्सला अधिकृतपणे १४ वी कॉर्प्स म्हणतात. सध्या सियाचीनमध्ये दिवसाचे तापमान उणे २१ अंश सेल्सिअस आहे. तर रात्रीचा पारा उणे ३२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. अशा स्थितीत आपले शूर सैनिक हवामानाशी लढताना सीमेचे रक्षण करण्यात गुंतलेले असतात. सियाचीनला १९८४मध्ये लष्करी तळ बनवण्यात आले. त्यानंतर २०१५ पर्यंत केवळ खराब हवामानामुळे ८७३ जवानांना आपला जीव गमवावा लागला आहे. सियाचीन ग्लेशियरवर ३ हजार सैनिक नेहमीच तैनात असतात. या तीन हजार जवानांची सुरक्षाही अत्यंत महत्त्वाची आहे. सियाचीन येथे उपस्थित असलेल्या सैनिकांवर भारत सरकार दररोज सुमारे ५ कोटी रुपये खर्च करते. त्यात सैनिकांचा गणवेश, शूज आणि स्लीपिंग बॅगचाही समावेश आहे. मूळची राजस्थानमधील उदयपूरची रहिवासी असलेली शिवा१२ वर्षांची असल्यापासूनच अनेक अडचणींचा सामना करत आहे आणि जेव्हा भारतीय लष्कराने तिची पोस्टिंग सर्वोच्च युद्धक्षेत्रात जाहीर केली तेव्हा केवळ राजस्थानच नाही तर संपूर्ण देश तिची कहाणी बनला होता. संघर्ष. ऐकून आश्चर्य वाटले. लष्कराने कॅप्टन शिवा चौहान यांच्याबद्दल फारशी माहिती दिली नसली तरी, लष्कराच्या सूत्रांचे म्हणणे आहे की, शिवाचा सोमवारीच सियाचीन ग्लेशियरसाठी सैन्य दलात समावेश करण्यात आला होता, तरीही हवामानाने त्यांची परीक्षा घेतली. शिवाच्या नेतृत्वाखालील कॉर्प्स ऑफ आर्मी इंजिनिअरिंग (SEPPERS) संघ तैनातीदरम्यान अनेक गंभीर अभियांत्रिकी कार्ये हाती घेईल आणि किमान तीन महिने तेथे तैनात असेल.जगातील सर्वात उंच युद्धभूमीवर, हवामान शत्रूच्या गोळीपेक्षा अधिक निर्दयी आहे. येथे तापमान दिवसा -५० अंश आणि रात्री -७०अंशांपर्यंत राहते. त्यामुळे येथे तैनात असलेल्या जवानांना कठोर प्रशिक्षणातून जावे लागते.



सियाचीनमध्ये शत्रूच्या गोळीपेक्षाही क्रूर हवामान, तिथं आहे खडतर प्रशिक्षण, फोटो पाहून थक्क व्हाल सियाचीन ग्लेशियरवर जवान तैनात प्रतिमा क्रेडिट स्रोतः इंटरनेट सियाचीन ग्लेशियरवर पोस्ट करण्यात आलेल्या भारतीय लष्कराच्या फायर अँड फ्युरी कॉर्प्सच्या महिला अधिकारी कॅप्टन शिवा चौहान यांची छायाचित्रे सर्वसामान्यांच्या मनाला हेलावून टाकणारी आहेत. जगातील सर्वात उंच युद्धभूमीवर, हवामान शत्रूच्या गोळीपेक्षा क्रूर आहे . येथे तापमान दिवसा -५० अंश आणि रात्री -७० अंशांपर्यंत राहते. त्यामुळे येथे तैनात असलेल्या जवानांना कठोर प्रशिक्षणातून जावे लागते. हे प्रशिक्षण इतके कडक असते की अर्ध्याहून अधिक सैनिकांना ते पूर्ण करता येत नाही. येथे तैनात होण्यापूर्वी जवानांना कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते आणि त्यांना येथे कोणत्या प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागते ते जाणून घेऊया. पहिले प्रशिक्षण १०,०००फूट उंचीवर होते. सियाचीन ग्लेशियरमध्ये तैनात होण्यापूर्वी लष्कराच्या जवानांना खडतर प्रशिक्षण घ्यावे लागते. यासाठी त्यांना गुलमर्गजवळील खिल्लनमार्ग येथे १०,००० फूट उंचीवर असलेल्या हाय ॲटिट्यूड वारवेअर स्कूलमध्ये पाठवले जाते. जगातील सर्वोत्तम शाळांमध्ये या शाळेची गणना होते. येथे जवानांना प्रथम बर्फात जड वजनाने स्कीइंग करायला शिकवले जाते. ते बर्फात कसे टिकून राहू शकतात आणि शत्रूला चोख प्रत्युत्तर देऊ शकतात यासाठी ते तयार आहेत. सुरुवातीच्या प्रशिक्षणानंतर त्यांना पर्वतीय युद्धाचे प्रशिक्षण दिले जाते. यानंतर, जवानांना सियाचीन बॅटल स्कूलमध्ये पाठवले जाते जेथे त्यांना महिनाभर प्रशिक्षण घ्यावे लागते.

## भूतदया जपणारे दिवंगत डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांचे अद्वितीय श्वानप्रेम !

आधुनिक केसरी

**कंधार : पृथ्वीतलावर मानव अस्तित्वात आला त्यावेळेस पासून आज पर्यंत मानव अन् प्राण्यात अतुट प्रेमभाव जपणारे नाते अतुट आहे. त्यातल्या त्या श्वान प्राणी हा इमानदारी जोपासणारा मुका पण नासिकारंध्रावर गंधाचे प्रभुत्व असणारा एकमेव प्राणी. ४ डिसेंबर २०२२ पासून महाराष्ट्राची मुलुखमैदानी तोफ, मन्याड खोऱ्याचा ढाण्या वाघ, मुक्ताईसुत वंदनीय दिवंगत डॉ.भाई केशवराव धोंडगे साहेब संभाजी नगर (औरंगाबाद) येथील एम.जी.एम हॉस्पिटल मध्ये जवळपास एक महिना काळासोबत दोन हात करत झुंज देत होते.पण नियतीने घाला घातला. अन् १ जानेवारी २०२३ या नवर्षाचा जल्लोष सर्वत्र साजरा होतांना मन्याड खोऱ्यातील ढाण्या वाघाला आपल्या कवेत घेऊन गेली.**

अख्ये मन्याड खोरेच नव्हे अख्या भारत देशावर शोककळा पसरली.लोकसभा वास्तूने दुःखाश्रू ढाळले. महाराष्ट्र विधानसभा वास्तू आपला सदस्य आपल्यास सोडून गेल्याने ढसाढसा आसवे गाळली. गंगथडीचा मराठवाडा पोरका झाल्याने गोदामायीस आसवांचा महापूर आला.मन्याड खोऱ्याने अक्षरशः धायमोकलून हंबरडाच फोडले. कंधार नगरीच्या ऐतिहासिक छ. शिवाजी चौकाने आपल्या रांगड्या वाणीने करोडो लोकांवर गारुड घालणारे लाल खंदारी व्यक्तीमत्व जणुकांही हरवल्यागत मनाने चलबिचल झाले. क्रांतिभुवन बहाद्दरपुरा नगरीचा बावन्नकशी प्लॅटीनमचा दागिणा हरवल्यागत बेचैन झाला.श्री व्दादशभुदेवी सर्वलोकाश्रय मंडप मुक्ताईप्रभा निवासस्थानाने चक्क अंथरुण धरले.करोडो चाहते दुःख सागरात बुडाले. मातोश्री मुक्ताई धोंडगे यांच्या अर्ध पुतळा आपल्या बाळ केशवांच्या जाण्याने दुःख वियोगाने मुर्छीत झाला. एवढ्यावरच हे सर्व थांबले नाही.तर दिवंगत डॉ.भाई केशवरावजी धोंडगे साहेब यांनी अनेक जिवाभिवाचे सहकारी शेकडो नव्हे लाख्खो कमविले.प्रत्येक पुरुष व महिला यांना दुःख अनावर होवून प्रत्येकांनी आपल्या भावनेला अश्रू रुपाने वाट
एवढ्यावरच न थांबता त्यांनी हे निसर्ग,वृक्ष,प्राणिमात्रांना जिवापाड लढा लावला.त्यांचे श्वान प्रेम अख्या नंदीग्राम जिल्ह्यात परिचित होते.राणा आणि ज्युली या श्वानाच्या जोडीने आपल्या मालकांचे दर्शन इतके दिवस का झाले नाही? आपल्या मालकांना न पाहता एका महिन्याचा कालखंडात गेला भेट झाली नसल्यामुळेच .२ आणि ३ जानेवारी २०२३ या दोन दिवस मुक्ताई प्रभा निवासस्थानी सर्वच सदस्य व्यस्त होते.म्हणून आज दि.४ जानेवारीस सकाळी डॉ.भाई धोंडगे साहेब यांचे कनिष्ठ सुपुत्र प्रा.डॉ. पुरुषोत्तम केशवराव धोंडगे आणि डॉ.भाई साहेब यांच्या सुकन्या प्रा. चित्राताई दिगंबरराव लूंगारे (कंधार) व सौ.भारिरथा तातेराव आहेर (परभणी) मुक्ताईसुताची सुश्रूषा करणारे माधवराव आंबटवाड सर,डॉ.भाई धोंडगे साहेबांचे शिषोत्तम दत्तात्रय एमेकर गुरुजी,अँड डॉ.प्रकाश डोम्पले सर, प्रशांत कलमे सर उपस्थित होते.नंतर त्यांना स्विमिंग टॅकच्या जाळीत बंदिस्त केल्या नंतर माऊली हॉस्पिटलचे डॉक्टर शिवाजीराव शिंदे, त्यांचे चिरंजीव आणि प्रा.सुधाकर कौसल्ये उपस्थित झाले.हे सर्व जण डॉ.भाई धोंडगे समाधीस्थळा समिप बसलो होतोत.त्यावेळेस ज्युली व राणा यांना डॉ.भाई धोंडगे यांची सूश्रूषा करणारे दत्ता सुखदेव यांनी व बंदुके यांनी श्वानांना सोडताच ज्युली (मादी श्वान) व राणा (नर श्वान) यांनी आपल्या पट्टापकड वीरांना खेचतच डॉ.भाई केशवरावजी धोंडगे साहेब यांच्या समाधीस्थळी फरकडत आणले.



आणि हंबरडा फोडून दुःखाश्रू गाळू लागले.या क्षणाचे व्हिडिओ चित्रीकरण मोबाईल तांत्रिक बिघाडामुळे लाइव टिपता आला नाही याचक खंत वाटते आहे. त्यावेळेस प्रा.डॉ.भाई पुरुषोत्तम भाऊ धोंडगे यांनी त्या मुक्या श्वानाचे सांत्वन केले.त्यावेळेस त्यांनी आपला वियोग आवरता घेतला.

महेंद्र बोराळे
संपर्क क्र. 9730442005

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पत्रकार कोणाला म्हणावे ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**भारतातीय वृत्तपत्राचा गौरवशाली इतिहास आहे.लोकशाहीत वृत्तपत्राचे स्वातंत्र्य असणे महत्वाचे आहेच.स्वातंत्र्यापूर्वीची पत्रकारिता आणि आताच्या पत्रकारितेत फार मोठा फरक दिसत आहे. लोकमान्य टिळक, बाळशास्त्री जांभेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पत्रकार होते.त्यांची लेखणी परकीय सत्तेच्या विरोधात अन्याय,अत्याचार जातीय व्यवस्था, जुन्या रूढी परंपराच्या विरोधात तलवारीच्या धारेप्रमाणे चालत होती. त्यात सरकार तर जखमी होते.ती लेखणी स्वकीयांना मोहित करणारी राष्ट्र प्रेम निर्माण करणारीही होती.त्यांनी लोकांच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली म्हणून स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर एक दशक सोडले तर विसाव्या शकतात पत्रकारांच्या लेखणीचा वापर स्वकीयांच्या माना कापण्यासाठी केला जात आहे. आता पत्रकार कोणाला म्हणावे, याची शासन दफ्तरी व्याख्या निश्चित नाही.ग्रामीण पत्रकाराला शासन मानत नाही.**

पत्रकारांच्या लेखणीत अंहकार भरला आहे. ती बिकावू ,पक्षधार्जिणे, मालक धार्जिणे बनली. पत्रकार हा व्यवसाय बनला आहे. त्याला बाजारूपणाचे स्वरूप आले आहे. आता वृत्तपत्रांना विविध पक्षाची लेबल लागली आहेत. समाजसेवा करणाऱ्या व्यक्ती पेक्षा जाहिराती देणारा खरा पत्रकार मानलो जातो. स्वातंत्र्यानंतरही आचार्य अत्रे अन्य पत्रकार होऊन गेले. त्यांची भूमिका स्पष्ट होती. त्यांनी सरकारच्या धोरणाच्या विरोधात परखडपणे लिहून तुरूंगात जाणे पंसत केले, पण कधी सरकारकडे दया याचना केली नाही. त्यांच्या लेखणीत व्यक्ती व्देष किंवा आकस नव्हता. मराठवाड्यातही स्व.अनंत भालेराव आणि सुधाकराव डोईफोडे निर्भीड पत्रकार होते,यांनीही शासनावर हल्ला करताना स्वतः वृत्तपत्राच्या जाहिरातीची काळजी केली नाही. शासन आणि मुख्यमंत्र्याच्या विरोधात भूमिका घेतल्याबद्दल मराठवाडा, लोकमत, तरूण भारत आणि प्रजावाणी या वृत्तपत्रांच्या जाहिराती बंद करण्यात आल्या होत्या. राज्यातील अनेक वृत्तपत्र हे भांडवलदारांच्या मालकीचे आहेत. तसेच पक्षाच्या दावणीला बांधले गेले आहेत. वृत्तपत्र मालक त्या वृत्तपत्राचे धोरण ठरवित असतो. मालक सांगितल्याप्रमाणे संपादक व पत्रकार आपली लेखणी झिजवत आहेत व भूमिका मांडत आहेत. आजची पत्रकारिता निः पक्ष आणि न्याय देणारी आहे का? खरच आज पत्रकारांना लिखाण स्वातंत्र्य आहे का ?असा प्रश्न माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. शंकरराव चव्हाण नेहमी विचारत असत. कारण वृत्तपत्राचे धोरण मालक ठरवितो, सामान्य पत्रकार नाही. पत्रकारांच्या नावावर विविध संघटना अधिवेशन घेतात. यातून पैसा कमविण्याचा धंदा बनला आहे. यातून पत्रकारांचे प्रश्न किती सुटले? प्रत्येक संघटना शासन निर्णयाला आमच्या दवाबामुळे शासनाला निर्णय घेणे भाग पडले असा दावा करत असतात. पत्रकार संघटना विविध आहत!त्यात एकजूट नाही.

महाराष्ट्रात तर महाविकास आघाडीने दोन पत्रकाराना तुरुंगात टाकले होते. त्यावेळी ही मंडळी गप्प का होती.आता तर पत्रकाराचां बाजार भरलाय! कोणाला पत्रकार म्हणावे? नाही? हे समजत नाही.त्यात कांही संघटना पत्रकारांना पुरस्कार कशासाठी देतात ? याबाबतचे निकष आहेत, हे त्यांना माहित.जर पत्रकारांना पुरस्कार हे त्यांच्या लिखानाला मिळत असतील तर चांगलेच! पण ते लिखाण समोर येत नाही. देश संविधानाने बांधलेला आहे. या चौकटीतच सत्तांतर आणि निर्णय होत असतात.लोकांच्या मताच्या अधिकारामुळेच केंद्रात भाजपचे म्हणजे मोदींचे सत्तेवर आले.पत्रकारांच्या मेहरबानीमुळे नव्हे! तेंव्हा त्या सरकारला पाच वर्षे काम करू दिले पाहिजे. शासनाच्या चुकीच्या धोरणावर पत्रकारांनी टीका केली आहे, त्याचबरोबर सरकारच्य चांगल्या योजनांचे कौतूक केले पाहिजे. पण आज चित्र पहावयास मिळत नाही. काही पत्रकाराच्या लेखणीत भाजप आणि मोदी व्देष ठासूनभरलेला आहे. लोकशाहीत लोकांच्या मताचा पाच वर्षे आदर करा. पण भाजप पक्ष सत्तेवर येताच देशावर संकट कोसळल आहे. आरजकता निर्माण झालीय, लोकशाही, अभिव्यक्ती, विचार लिखाण सर्व धोक्यात आल्याचे चित्र निर्माण केल जात आहे. काँग्रेस पक्षाने रोज टीका करत असले तरी तो राजकारणाचा भाग असू शकतो. वृत्तपत्र जर सूपारी घेतल्याप्रमाणे लिखाण करू लागले आहेत. काही पत्रकारांना भाजप सरकार सत्तेवर राहू नये व पुढे येऊ नये असे वाटते. लोकशाहीत भाजपला सरकारला ठेवायचे की नाही हा अधिकार



लोकांचा आहे. राज्यातील नामवंत एका पत्रकाराने तर २०१३ मध्ये भाजपचे केंद्रात येणारच नाही, असे भविष्य केले होते. त्यानंतर जी दातखिळी बसली ती उघडली नाही. आता ते चालू आहे. २०१९ मध्ये मोदी सरकार येणार नाही,असे सांगत आहेत.ते निवडणूकीत लोक ठरतील. १९७५ मध्ये आणीबाणी वृत्तपत्र स्वातत्र्यावर बंधने आणली गेली होती. काँग्रेस सरकार वृत्तपत्रांना जाहिराती देतांना शासनाच्या बाजून लिहिणे बंधन असावयाचे,आज तसे वृत्तपत्रावर बंधन नाहीत.

महाराष्ट्रात वृत्तपत्रांची संख्या १९११ इतकी आहेत. या वृत्तपत्रांना खपाच्या आधारावर शासकीय जाहिराती मिळत असत. वृत्तपत्रांची संख्या त्यांची खपाची आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्र साक्षरतेत केरळ राज्याला मागे टाकेल. राज्याचे माहिती महासंचानालय वृत्तपत्राच्या खपाची आकडेवारी वेबसाईटवर टाकली जात नाही. काही वृत्तपत्र केवळ जाहिरातीसाठीच काढले जातात. इतकेच एकाच घरात शासन मान्य असलेली वृत्तपत्रे आहेत. वृत्तपत्राची खोटी आकडेवारी व माहिती देऊन कांही जण शासनाला फसविले जातेय, हे सत्य आहे.अधिस्वीकृती समितीत सदस्य असताना वृत्तपत्रांची धक्कादायक दिसून आली. यात , रान पाखरू, अतिरेकी, भष्टाचार, वैरी, हँटर, आंधळा मारतो डोळा, केला इशारा जाता जाता. मुडदे की जान खतरे में' अशी होती. तेंव्हा अश्या वृत्तपत्रांना शासनाने मदत करावी काय? राज्यातील वृत्तपत्र मालक हे पत्रकार आणि कर्मचाऱ्यांचे हित पहात नाहीत,हे स्पष्ट झालेले आहे सर्वोच्च न्यायालयाने पत्रकारांना मंजिठीया आयोगाप्रमाणे प्रमाणे वेतन देण्याचा निर्णय दिला. पण वृत्तपत्र मालक या प्रमाणे पत्रकारांना आणि कर्मचारी वर्गांना वेतन देण्यास तयार नाहीत. महाराष्ट्रात केवळ ४५ वृत्तपत्रांनी मंजिठीया आयोगाप्रमाणे पत्रकारांना वेतन देत आहेत. इतर इतर वृत्पत्र या आयोगाप्रमाणे पत्रकारांना वेतन का देत नाहीत? हे कोणी का विचारत नाही. याचे आश्चर्य वाटते. कांही वृत्तपत्रांनी तर पत्रकारांना नोकरीवरून काढून टाकले आहे.अनेक पत्रकारांचे कुटुंब उघड्यावर पडले.तेंव्हा कुठे गेला पत्रकार धर्म? पत्रकार जगला तरच लोकशाही टिकेल, असे आपणला का वाटत का नाही. राज्यसभेत माजी खासदार शरद यादव यांनी वृत्तपत्र मालकांमुळे लोकशाही धोक्यात आल्याची भीती व्यक्त केली होती. त्यांनी श्रमिक पत्रकारांना संरक्षण देण्याची मागणी केली होती. शासन ग्रामीण पत्रकारांना पत्रकार म्हणून मानत नाही.त्यामुळे त्यांना अधिस्वीकृती पत्र दिले जात नाही.हा पत्रकारावर हा अन्याय नाही का? वृत्तपत्र खरेच नि :पक्ष आणि दर्जेदार आणि निघणारे छोटी वृत्तपत्र जगले पाहिजे. शासनाने अश्या वृत्तपत्रांना मदत केली पाहिजे, हेच वृत्तपत्र शासनानी बाजू मांडणारे असतात. १९८२ मध्ये बॅ. अंतुले यांनी राज्याची मुख्यमंत्री असतांना छोटे वृत्तपत्र चालली पाहिजेत, म्हणून शासनाच्या मोठ्या प्रमाणात जाहिराती ( ठोकळे, ब्लॉक) सुरू देण्यास सुरुवात केली होती. पुढे काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनीच हे धोरण बंद केले.यावेळेस मोठ्या आणि भांडलवदारांच्या वृत्तपत्रांनी टीका केली होती. जर काही वृत्तपत्र शासनाची फसवणूक करून जनतेचा पैसा लुटत असतील तर अशा वृत्तपत्राच्या जाहिराती बंद का करू नयेत? अश्या बाजारबुणग्या पत्रकारांना शासनाने पोसावे, अशी अपेक्षा आहे काय? शासनाने कांही वृत्तपत्रांना जाहिरात यादीतून का वेगळले? याचे कारणे पाहिली गेली पाहिजे. जर हे वृत्तपत्र नियमाचे पालन करत नसेल शासनाने त्यांच्या जाहिराती बंदी करू का करू नयेत. वृत्तपत्राचा मालक हा वाचक असतो.कारण तो ठरवितो ते वृत्तपत्र वाचायचे की नाही.त्याच बळावर आजचे वृत्तपत्र स्पर्धेत टिकते. हे दिसतेय! वृत्तपत्राच्या लिखाणामुळे सरकारच्या विरोधात समाजाचे मत परिवर्तन करू शकतो,असा समज आहे.असे असते तर वृत्तपत्राचे मालक निवडून आले असते वृत्तपत्रातील बातमीचे मूल्य आता शून्य आहे. वृत्तपत्र वाचून झाले की त्याची रद्दी होते. तेंव्हा वृत्तपत्रातील लेख आणि वृत्तावर समाज विश्वास ठेवत नाही. याला समाज नव्हे पत्रकारच जबाबदार आहेत.कारण सकारात्मक वृत्त देण्यापेक्षा भडक व राजकीय घटना महत्वाच्या वाटतात. त्यात पित पत्रकारितेचे प्रमाण वाढले आहे. पेड न्यूज,"फेक न्यूज' ची कीड लागली आहे. निवडणूक आयोगानेही पेड न्यूज प्रकरणी चिंता व्यक्ती केली आहे. निवडणूकीच्या काळात मोठ्या वृत्तपत्रांनी उमेदवारांच्या बातम्या प्रकाशित करण्यासाठी पॅकेज सुरू केले आहे. तेंव्हा पत्रकारांच्या विश्वासनीयतेवर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे, तेंव्हा पत्रकारांना त्याबाबत आत्मचिंतन करण्याची खरी गरज आहे.

# वृत्तपत्र-पत्रकारिता - व्रत आणि व्यवसाय



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**वृत्तपत्रांचा इतिहास हा चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते आणि याच विचारातून जवळपास 183 वर्षापूर्वी म्हणजे 6 जानेवारी 1832 रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' हे वृत्तपत्र सुरू केले. मराठीतील पहिले संपादक होण्याचा बहुमान मिळविला. त्यांची आठवण म्हणून आपण ६ जानेवारी रोजी महाराष्ट्रात "दर्पण दिन" साजरा करतो. . त्याकाळी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपला देश असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे असे बाळ शास्त्रींना वाटले. त्यामुळे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत 'दर्पण' ची सुरूवात मुंबई येथे केली.**

त्याकाळी सुरु झालेल्या मुद्रणालयाचा त्यांनी समाज प्रबोधनासाठी उपयोग करुन घेतला.25 जून 1840 साली दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.

दर्पणच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, मनोरंजन,आणि समाजप्रबोधनाचा हेतू साध्य केला. 'दर्पण' मध्ये एकही जाहिरात त्यांनी छापली नाही. अगदी स्वतःचे पैसे टाकून जवळपास आठ वर्षे लोकांसाठी वृत्तपत्र सुरु ठेवले. यावरुनच आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा वृत्तपत्र सुरू करण्यामागील हेतू आणि तळमळ स्पष्ट होते. त्यावेळी गव्हर्नर जेम्स कार्नाक यांनी जस्टीस ऑफ पीस असा किताब देऊन बाळशास्त्रींचा गौरव केला.

वडील गंगाधरशास्त्री हे पंडित तर आई सगुणाबाई धार्मिक. त्यांचाच वारसा बाळशास्त्रींना मिळाला. कोकणांतील पोंभुर्ले या गावी जन्म आणि तद्नंतर मुंबईतील वास्तव्य, शिक्षण, शिक्षणातील अडीअडचणीवर मात केली.. बराच खडतर प्रवास बाळशास्त्री यांनी केला. 1824 च्या सुमारास पोंभुर्ले सोडून बाळशास्त्री मुंबईत आले. इंग्रजी भाषेचा सखोल अभ्यास करुन विविध विषयांचे ज्ञान मिळवून त्याचा उपयोग आपल्या समाजाला कसा होईल याकडे त्यांचा ओढा होता. अगदी वयाच्या अकराव्या वर्षी संस्कृतचे शिक्षण पूर्ण करुन जांभेकरांनी मुंबई गाठली होती. इंग्रजीचे ज्ञान आत्मसात केले. तत्कालीन प्रमुख 8 भाषा व अनेक शास्त्रात ते पारंगत होते.त्यांची ग्रंथसंपदा पुष्कळ होती तसेच त्यांना अनेक सन्मान मिळाले होते. 1834 साली भारतातील पहिले प्राध्यापक होण्याचा बहुमान बाळशास्त्रींना मिळाला आणि 1845 साली ते राज्याच्या शिक्षण विभागाचे संचालक झाले. बाळशास्त्रींनी विविध विषयांवर ग्रंथ लिहिले. आचार्य बाळशास्त्री जांभेकरांबद्दल न्यायमूर्ती ना.ग.चंदावरकर यांनी म्हटले आहे की, "बाळशास्त्री अव्वल इंग्रजी अंमलातील एक थोर विद्वान तसेच ज्ञानाच्या विविध क्षेत्रात लिलया संचार करणारे पंडित होते. आचार्य अत्रे यांनी बाळशास्त्री जांभेकरांबद्दल खूपच महत्त्वपूर्ण अशी टिपणी केली आहे. ते लिहितात की, बाळशास्त्री जांभेकर हे बोलके नव्हे तर कर्ते सुधारक होते. केवळ प्राध्यापक म्हणून अध्ययनच न करता बाळशास्त्रींनी आपल्या दर्पण मधून सामाजिक सुधारणेवर भर दिला. दादाभाई नौरोजी हे आचार्य बाळशास्त्रींचे विद्यार्थी होते. बाळशास्त्री जांभेकर हे आद्य मराठी पत्रकार आणि आद्य समाजसुधारक होते. त्यांचे हे महान कार्य पुढील कित्येक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहे.

समाजातील वर्ण व्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडले. समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत, याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाज प्रबोधनाची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांचे आगमन ही घटना क्रांतीकारक ठरली. एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेल्या जांभेकरांना आपण दर्पणकार म्हणूनच ओळखतो. ब्रिटिश कालखंडात त्यांनी दर्पणच्या संपादनाची धुरा समर्थपणे वाहिली. भविष्यकाळातील माध्यमाची जबरदस्त ताकद त्यांनी तेव्हाच ओळखली होती. परकीय सत्तेला उलथून टाकायचे असेल तर समाजजागृती घडवायला हवी आणि त्यासाठी लेखणीला पर्याय नाही, हे त्यांना फार पूर्वीच समजले होते. वृत्तपत्राच्या संपादकाला आवश्यक असणारी भाषेची जाण आणि सामाजिकतेचे भान त्यांच्याकडे होते. आचार्य जांभेकर हे महाराष्ट्रातील पहिल्या पिढीतील समाजसुधारक होते. दर्पण हे बाळशास्त्रींच्या हातातील एक लोक शिक्षणाचे माध्यम होते. त्यांनी त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला. यात विशेष उल्लेख त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार. बाळशास्त्रींनी या विषयांवर विपुल लेखन केले. त्यामुळे त्यावर विचारमंथन होऊन त्याचे रूपांतर विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीत झाले.

ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजित ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. विज्ञाननिष्ठ मानव उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते.

सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून त्यांनी बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली. विविध समस्यांवर सकस चर्चा घडवण्यासाठी नेटिव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटीची स्थापना केली. यातूनच पुढे स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी या संस्थेला प्रेरणा मिळाली व दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड यांसारखे दिग्गज कार्यरत झाले.1840 मध्येच त्यांनी "दिग्दर्शन" या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरुवात केली. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी 5 वर्षे काम पाहिले.

या अभिनव माध्यमातून त्यांनी लोकांची आकलन क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या विद्वत्तेला जोड होती ती बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची. संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी, व्यतिरिक्त आठ ते दहा भाषा त्यांना येत होत्या.

या भाषांसह विज्ञान, गणित, भूगोल, शरीरशास्त्र व सामान्य ज्ञान या विषयांवरही त्यांचे प्रभुत्व होते. मराठीतील वृत्तपत्रांचे जनक असा त्यांचा नावलौकिक आहे. त्याचबरोबर रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले पहिले भारतीय असाही मान त्यांच्याकडे जातो. 1845 मध्ये त्यांनी केलेले ज्ञानेश्वरीचे मुद्रण हे या ग्रंथाचे पहिले मुद्रण मानले जाते. बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले. तसेच त्यांनी नीतिकथा, इंग्लंड देशाची बखर, इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, हिंदुस्थानचा इतिहास, आदी ग्रंथांची निर्मिती केली. साधारणपणे 1830 ते 1846 या काळात बाळशास्त्रींनी आपले योगदान देशाला दिले. या काळात समाज बहुसंख्येने निरक्षर, अंधश्रद्धाळू व अज्ञानी होता. म्हणूनच अवघ्या 34 वर्षांच्या आयुष्यात, विविध क्षेत्रात त्यांनी केलेले प्रचंड कार्य मोलाचे ठरते. 6 जानेवारी रोजी दर्पणचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.हाच योगायोगाने बाळशास्त्रींचाही जन्मदिवस आहे. तोच स्मृती दिवस पत्रकार दिन म्हणून आज महाराष्ट्रात साजरा केला जातो.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेचा वापर केला. त्याचबरोबर जातीभेद निर्मूलन आणि विधवा पुनर्विवाह यालाही त्यांनी प्राधान्य दिले. त्यामुळेच त्यांचा उल्लेख "आद्य समाजसुधारक" असा केला जातो. कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंबुर्ले येथे 1812 च्या उत्तरार्धात जन्म झालेल्या बाळशास्त्री यांचे वयाच्या अवघ्या 34 व्या वर्षी 1846 मध्ये निधन झाले. मागील काळाचा विचार केला तर, त्यावेळी पत्रकारिता, वृत्तपत्र, हे व्रत होते. परंतु आता बदलत्या काळात त्याने व्यवसायाचे स्वरूप घेतले आहे. आता प्रिंट मीडिया- वृत्तपत्रे, आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया म्हणजे दूरसंचार सारखी माध्यमे प्रगत झालेली आहेत. पण त्या प्रगती बरोबरच त्यांच्या वर अनेक बंधने आली आहेत. कारण बहुतेक मोठी वृत्तपत्रे आणि दूरसंचार वाहिन्या हे कोणाच्यातरी अधिपत्याखाली आहेत. त्यांची वेगवेगळे मालक आहेत. अर्थातच ही भांडवलदार मंडळी आहेत. आणि आज ही सर्व भांडवलदार मंडळी राजकीय अर्थात सत्ताधारी पक्ष्यांच्या अंकित आहेत. म्हणजेच वृत्तपत्र वाहिन्या यांचे मालकांवर विचाराचा नाही म्हटलं तरी प्रभाव येतोच आणि त्यांच्यावर सरकारची दृष्टी ही असतेच. त्यामुळे त्यांच्या विरोधात जाऊन काही गोष्टी सत्य असल्या तरी दबावामुळे त्या बऱ्याच वेळा समोर येत नाही हे सत्य नाकारून चालणार नाही. मग त्या त्या वेळी जो पक्ष सत्तेवर असतो तो,पक्ष कुठलाही असो. त्यांच्याविरोधात लिहिल्या बातम्यांची नोंद घेतली जाते आणि मग आर्थिक दृष्ट्या मिळणाऱ्या जाहिरातींना फटका बसतो. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रबोधनाचं साधन ते मार्केटिंग असं काही स्वरूप आले आहे. आताच्या काळात चर्चेमध्ये नेहमीच प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रोनिक मिडिया यांच्यावर आरोप केला जातो कि ते प्रवाहाच्या दिशेने जात असतात किंवा आपल्या मालकांच्या विचाराच्या दिशेने जात असतात,त्यांना त्यांच्याशी जुळवून घ्यावेच लागते. आता वृत्तपत्र व्यवसाय म्हणजे मोठ्या भांडवली गुंतवणूक हे समीकरण झाले आहे. त्यामुळे त्यासाठी जाहिराती हेच मोठं माध्यम आहे. त्यामुळे वृत्तपत्राच्या संपादकाला स्वतःचा म्हणून वेगळा विचार करून वृत्तपत्र चालवता येत नाही. वेगळा विचार मांडता येत नाही. आजच्या काळात जसे संपादकांच्या अग्रलेखातून परिवर्तन होत आहे असे आता राहिले नाही किंवा त्याला थोडे फारच वृत्तपत्र अपवाद ठरतील कारण फारच कमी म्हणजे पाच-दहा टक्के लोकच अग्रलेख, विशेष लेख वाचतात हा निष्कर्ष आहे. आजच्या काळात पत्रकारितेच्या उद्देशात बदल झालेला आहे पहिल्या पानातच बातम्यांनी त्यांची भूक भागते असेच काहीतरी झाले आहे. लोकशाहीच्या चार स्तंभा पैकी माध्यम हा एक महत्त्वाचा चौथा स्तंभ मानला जात आहे. वृत्तपत्रांना समाजमनाचा आरसाही म्हणतात. परंतु सध्याच्या परिस्थितीत तो स्तंभ डळमळीत झाला आहे काय ? त्या आरशात स्पष्ट असे काही दिसत नाही का ?अशी शंका निर्माण होत आहे. अर्थातच वृत्त माध्यमांचे मनोरंजनीकरण झाले आहे, असा सूर अनेकदा होणाऱ्या चर्चांमधून वाचायला ऐकायला मिळतो. अनेकदा अनेक सत्य समोर आणतांना पत्रकारांवर हल्ले होतात. त्यादृष्टीने अशा पत्रकारांसाठी सुरक्षितता ही आवश्यक आहे. आपले विचार निर्भीडपणे मांडणे आणि आपली विवेकबुद्धी जागृत ठेवणे हे पत्रकारांन साठी महत्त्वाचे आहे. त्यासाठी पत्रकारांनी प्रवाहाच्याच दिशेने वाहत न जाता विरुद्ध दिशेलाही जाण्याचा प्रयत्न करायला हवा आहे. अर्थात केवळ विरोधासाठी विरोध म्हणून नाही. विचार करायची अवस्था निर्माण झालेली आहे. आणि तो झाला तरच अशी समाजमनाच प्रबोधन करणारी पत्रकारिता, शोधपत्रकारिता, टिकणार आहे. आज महाराष्ट्रात दर्पणकार बाळशास्त्रीं च्या स्मृतिप्रीत्यर्थ "दर्पणदिन" साजरा करतो. या दिवशी आपण या सर्व गोष्टींचा एकूणच सामाजिक, राजकीय, आणि प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया या सर्व पातळीवर विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे असे वाटते. वृत्तपत्र आणि पत्रकारिता हे व्रत म्हणून स्वीकारले जाईल तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने दर्पणदिन साजरा केला असे म्हणता येईल.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# पत्रकारिता ही भारतीय लोकशाहीची ढाल

आधुनिक केसरी

**पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते. पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे साधन आहे. महाराष्ट्रात दरवर्षी 6 जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो. हा दिवस आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरा केल्या जाते.**

बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे "द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म" या रूपाने सुध्दा ओळखले जाते.म्हणुनच महाराष्ट्र सरकारने पत्रकार दिवस 6 जानेवारी या दिवशी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त घोषित केला आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात 6 जानेवारी हा मराठी पत्रकार दिवस म्हणुन साजरा केला जातो. जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखान करने. कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय.जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहीणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणून जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे, उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला "चौथास्तंभ" ही उपमा दिली आहे. जागतीक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती 135 कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी 6 जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. 1920 मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतान्त्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते. तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो.प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन,वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया,ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वतःच्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात "चौथास्तंभ".पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता,कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता,नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक



पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात.पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण( धारधार ) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते. कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते. आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल, जल, वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे यातील घडामोडी जनतेला कळुन येतात. आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो. या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते. त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो. तेव्हा देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे.आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो. मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.1832 साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील पहिले वृत्तपत्र होय. त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी "दर्पण"मध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदी टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण( धारधार ) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती. त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात ही वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहिन्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात. याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे. आपल्या पूर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही ईजा येवु दिली नाही.6 जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी, वादळ यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते.पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो. परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. 6 जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम करतो आणि मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतो.



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

# मराठी पत्रकारितेचे बदलते जग

आधुनिक केसरी

**वृत्तपत्रांचा इतिहास हा जनतेचा आणि चळवळींचा इतिहास असतो. वृत्तपत्रे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात. त्याद्वारे लोकांना सामाजिक संकेत, कार्यात्मक भूमिका आणि मूल्य याबाबतचे शिक्षण दिले जाते. १८३२ चा काळ, अर्थातच इंग्रजांच्या अधिपत्याचा काळ होता. राष्ट्रभक्तीसाठी समाजास प्रबोधनाची मोठी गरज होती. इंग्रजांच्या हातात आपले राष्ट्र असताना आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करुन, परिस्थितीची जाणीव करुन देण्यासाठी एखादे वृत्तपत्र असावे, असे आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना वाटले.**

त्यानुसार आचार्य जांभेकरांनी केवळ लोककल्याण आणि लोकशिक्षण असाच उदात्त हेतू नजरेसमोर ठेऊन मुंबई येथे ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या इंग्रजी आणि मराठी भाषेतील पाक्षिकाची सुरूवात करून मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या कार्यामुळे मराठीतील आद्यसंपादक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. त्यांच्या या महत कार्याची आठवण आपणास रहावी म्हणून प्रतिवर्षी ६ जानेवारी रोजी राज्यात दर्पण दिन साजरा केला जातो. १८३२ ते २०२२ हा पावणे दोनशे पेक्षा जास्त वर्षांचा काळ. मराठी पत्रकारितेनं या काळात अनेक स्थित्यंतरं अनुभवली. स्वातंत्र्य चळवळीत राजकीय भान निर्माण करणारी, अनेक सामाजिक बदलांसाठी आग्रही राहणारी ते आताची २४ बाय ७ पत्रकारिता. खिळे जुळवण्यापासून ते डिजिटल प्रिंटिंग, पेन ते कॉंप्युटर, मुद्रित माध्यमं, टीव्ही चॅनेल्स ते हातातल्या मोबाईलवर वेळोवेळी येणारे अपडेट्स पत्रकारिता बदलत राहिली आहे. या बदलांशी स्वतःला जुळवून घेताना माध्यमांना अनेक आव्हानांचाही सामना करावा लागला, आजही लागत आहे. या बदलांचा आणि आव्हानांचा यानिमित्ताने घेतलेला हा आढावा. लोक आता प्रस्थापित माध्यमांकडून ऑनलाइन प्लॅटफॉर्मकडे वळत आहेत. टीव्ही किंवा इतर कुठलाही प्लॅटफॉर्म पूर्णपणे संपणार नाही. पण टीव्ही चॅनेल्स असो की वृत्तवाहिन्या यांच्यासमोरचं आज सर्वांत मोठं आव्हान म्हणजे लोकांच्या सवयींमध्ये होत असलेला बदल. २५ वर्षांपूर्वी परिस्थिती अशी होती, की लोक आदल्या दिवशी घडलेल्या गोष्टी दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात वाचायचे. त्यानंतर एक काळ असा होता, की दिवसभरात घडलेल्या गोष्टी संध्याकाळी टीव्हीवर बघितल्या जायच्या. नंतर घटना घडली, की लगेच दिसायला लागली. आता टीव्ही किंवा वर्तमानपत्राची बातमी ब्रेक करण्याची क्षमता कमी होत चाललीये. आज बातम्या सोशल मीडियावर ब्रेक होत आहेत. टीव्हीवर ते अधिक वेगानं लोकांसमोर पोहोचताना दिसतं एवढंच. आता पत्रकारितेतलं भविष्य हे डिजिटल आणि व्हीडिओ आहे. मोबाईल, टीव्ही हे आता माहितीचं प्रमुख माध्यम असेल आणि व्हीडिओ हा त्याचा महत्वाचा भाग असणार आहे. लोकांना आता वाचण्यापेक्षा पाहणं हे जास्त सोपं आणि इंटरेस्टिंग वाटतं. त्यामुळेच व्हीडिओ हे येत्या काळात महत्वपूर्ण ठरतील. त्याचप्रमाणे प्रादेशिक भाषांमधील कन्टेन्ट हा अधिक वाचला जाईल. वेबपोर्टल्सची संख्या वाढते आहे परंतु वर्तमानपत्र किंवा चॅनेलप्रमाणे त्यांचं रेव्हेन्यू मॉडेल तयार होऊ शकलेलं नाही. सध्या वर्तमानपत्रांसमोर अनेक अडचणी आहेत. न्यूज प्रिंट महाग झाली आहे. जीएसटी आहे. इतरही नवनवीन नियम आहेत. या सगळ्याचा वर्तमानपत्रावर आर्थिक बोजा पडत आहे. त्यामुळे वर्तमानपत्रं चालवायची कशी, हे सध्या सगळ्यांत मोठं आव्हान आहे. वर्तमानपत्रांसमोर दुसरी अडचण निर्माण झालीये, ती म्हणजे अनेकदा आल्याला सरकारी निर्बंधांचा फटका बसू नये म्हणून मालकही सरकारला न दुखावण्याची सावध भूमिका घेतात. खरं तर प्रस्थापितां विरोधात जाणं हेच पत्रकारांचं काम आहे. पण आता त्यापद्धतीचं स्वातंत्र्य पत्रकारितेत राहिलेलं नाही. आर्थिक कारणांमुळे जास्तीत जास्त महसूल मिळवणं हे आता वर्तमानपत्रांचं उद्दिष्ट झालं आहे. सध्याच्या परिस्थितीत प्रबोधनाचं साधन ते मार्केटिंगचं माध्यम असं वर्तमानपत्रांचं स्वरुप झालं आहे. सुरुवातीला प्रिंट माध्यमांसमोर इलेक्ट्रॉनिक मीडियाचं आव्हान होतं. पण इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या आगमनानंतर वर्तमानपत्रांनी स्वतःला बदललं. पण आता डिजिटल मीडिया, सोशल मीडिया वेगानं वाढत आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे. त्यामुळे छापून वर्तमानपत्रं विकणं कठीण झालं आहे. त्यामुळे सध्याच्या काळात प्रिंट मीडियाचं भविष्य हे फारसं आशादायक नाही. गेल्या काही वर्षात जागतिक तसंच राष्ट्रीय पत्रकारितेमध्ये जे आर्थिक-धोरणात्मक बदल होत आहेत, त्याचा परिणाम म्हणजे पत्रकारिता



ही काही ठराविक लोकांच्या हितसंबंधांपुरतीच मर्यादित झाली आहे. मराठी पत्रकारिताही याला अपवाद नाहीये. आजचं मराठी पत्रकारितेचं स्वरूप हे केवळ माहितीचं संकलन एवढ्या पुरतंच मर्यादित राहिलं आहे. घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावण्यात मराठी पत्रकारिता कमी पडत आहे. पत्रकारांवर विविध प्रकारचा दबाव आहे. अब्रूनुकसानीचा दावा ठोकून पत्रकारांना त्रास देण्याचा प्रकार केला जातो. राजकीय पक्षांच्या विरोधात केलेल्या बातम्यांची नोंद घेतली जाते. तुम्ही आमच्या पक्षाविरोधात बातमी दिलीत तर तुमच्या पेपरला दिल्या जाणाऱ्या जाहिराती कमी करून टाकू अशा पद्धतीने आर्थिक नाड्या आवळल्या जातात. पत्रकारांना मिळणारा पगार, सुटट्या, कामाच्या ठिकाणी मिळणाऱ्या सोयीसुविधा हे नीट असेल तर ७० टक्के पत्रकार चांगलं काम करतील. परंतु दुर्दैवाने तसं होत नाही. पत्रकारांना घर चालवायचं असतं. तेही अवघड होऊन जातं. यातूनच पत्रकार आणि राजकीय नेत्यांचं साटंलोटं होतं. त्यांच्यांविरुद्ध बातम्या दिल्याच जात नाहीत. सध्या पत्रकारांमध्ये वैचारिक आणि राजकीय पातळीवर विविध गट पहायला मिळतात. पत्रकारिता हा तसा वैचारिक प्रांत असल्याने ते स्वाभाविकच आहे. पण आता त्याला पक्षीय अभिनिवेशही जडला आहे. देशाची लोकशाही आणि सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्षता याबाबतीतली पत्रकारांची भक्तिमय मतं हा सर्वांत मोठा धोका मला येत्या काळात दिसतोय. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे मतप्रदर्शन. बातमीतली वस्तुनिष्ठता हरवली आहे. डेटा जर्नालिझम आणि शोधपत्रकारिता ही मराठी पत्रकारितेत अभावानेच दिसतेय. येत्या काळात पत्रकारांमध्ये हे स्कील तयार करण्याची गरज आहे.

आपला चेहरा रोज टीव्हीवर दिसत असला तरी आपण दीपिका पदुकोण नाही. आपण वारीत नाचत वगैरे असलो तरी माधुरी दीक्षित नाही हे पत्रकारांनी लक्षात घ्यायला हवं. पत्रकारिता एंटरटेनमेंटला रिप्लेस करू पाहत आहे. रिपोर्टिंग म्हणजे ज्युनियर्सनी करायची गोष्ट असाही दृष्टिकोन आहे. लोकांमध्ये जाऊन, त्यांच्याशी बोलूनच बातम्या व्हायला हव्यात. ते कमी होत चाललं आहे. आर्मचेअर जर्नलिझम रूढ होतं आहे. पत्रकारितेत फिल्डवर जाऊन काम करणं अपेक्षित आहे. परंतु पत्रकारांना फिल्डवर पाठवण्यासाठी माध्यम संस्था उत्सुक नाहीत. त्यामुळे राज्याच्या कानाकोपऱ्यातल्या बातम्या, तिथलं जग पोहोचतच नाही. सध्याच्या काळात प्रिंट-टीव्ही-डिजिटल हे भेद तितके काटेकोर राहिले नाहीत. आता वेगवेगळे माध्यमसमूह हे या तिन्ही माध्यमांचा समतोल साधताना दिसत आहेत. त्यामुळे मी प्रिंटसाठी काम करतो, मी टीव्ही किंवा डिजिटलसाठी काम करतो, असं म्हणण्यापेक्षा आता पत्रकारांनी या सगळ्या माध्यमांसाठी विशेषतः डिजिटलसाठी कन्टेन्ट बनवायला शिकणं हे अधिक महत्वाचं आहे. आता अभिव्यक्तीसाठी दर दीड-दोन वर्षांनी फेसबुक, ट्वीटर, टिकटॉक सारखी वेगळी माध्यमं येत आहेत. पूर्वी वर्तमानपत्रामध्ये मजकूर तयार करणारा संपादकीय विभाग आणि तो वाचकांपर्यंत पोहोचवणारा वितरण विभाग असे ठळक स्वतंत्र विभाग असायचे. डिजिटल माध्यमांच्या काळात कन्टेन्ट तयार करणं आणि तो वाचकांपर्यंत पोहोचवणं ही आता एकाच व्यक्तीची जबाबदारी आहे. कोणता कन्टेन्ट कधी तयार करायचा, तो कोणत्या वाचकापर्यंत पोहोचवायचा ही एकाच व्यक्तीची जबाबदारी असते. हेच आता मराठी पत्रकारितेसमोरचं आव्हानही आहे आणि भविष्यही आहे. बातमी देण्याची स्पर्धा आता गाव-खेड्यापर्यंत पोहोचली आहे. अनेक स्थानिक चॅनेल्स सुरू झाले आहेत. गाव-खेड्यात युट्यूब चॅनेल्सही सुरू झाले आहेत. त्यामुळे या २४ बाय ७ च्या स्पर्धेत टिकण्याची गरज स्थानिक पातळीवरही निर्माण झाली आहे. या सगळ्यामध्ये पत्रकारांना अभ्यासासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे बदलत्या माध्यमांच्या स्पर्धेत स्वतःला तयार कसं करणार हे आजच्या पत्रकारांसमोरचं प्रमुख आव्हान आहे.

स्थानिक पातळीवर काम करताना पत्रकारांना राजकीय किंवा अन्य दबावांना सामोरं जावं लागतं त्यामुळे अनेकदा पत्रकार स्वतःच स्वतःवर कोणाच्या विरुद्ध लिहायचं किंवा कोणाच्या विरुद्ध लिहायचं नाही, अशी बंधन लादून घेतात. पण मला वाटतं, की बातमीदारी वेगळी आणि व्यवसाय वेगळा हे पत्रकारांनी समजून घ्यायला हवं. एखाद्या नेत्याची जाहिरात घेतली म्हणजे त्याच्याविरोधात लिहिताच येत नाही असं नाही. व्यवस्थापनही तसा आग्रह धरत नाही. प्रिंट, रेडिओ, टीव्ही, डिजिटल, पॉडकास्ट अशी अनेक माध्यमं आली, येत राहतील. पण बदलणार नाही तो कन्टेन्ट. कन्टेन्टचा फॉर्म बदलत राहणार आहे. मराठी पत्रकारितेनं नवीन प्रवाह आत्मसात करायला हवेत. नवनवीन माहिती, तिचा वेग आणि दृष्टिकोन आत्मसात करायला हवा. भूमिका घ्यायला हव्यात. सध्या मराठी पत्रकार भूमिका घेण्यात मागे आहेत. जर भूमिका घेतल्या आणि त्या भूमिकांसाठी जी किंमत मोजावी लागते ती मोजायची तयारी ठेवली तरच भविष्यात पत्रकारिता टिकू शकेल. नाहीतर पत्रकारितेचं स्वरूप माहिती-मनोरंजन या पलीकडे जाणार नाही.

# अती घाई, संकटात नेई !!

आधुनिक केसरी



मागील वर्षी म्हणजेच १ जानेवारी २०२२ रोजी सरत्या वर्षाला निरोप आणि नविन वर्षाचे स्वागताच्या पार्श्वभुमीवर जम्मूच्या वैष्णोदेवी मंदिरात भक्तांनी अलोट गर्दी केल्याने चेंगराचेंगरीत १२ जणांना मृत्यू आला होता यंदाही थर्टी फर्स्ट साजरी करण्यासाठी ३१ डिसेंबरच्या रात्री देवस्थाने आणि पर्यटन स्थळांकडे जाणाऱ्या मार्गावर एकाच वेळी वाहने आणल्याने वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला होता
सन 2022 या वर्षात वाहन अपघातांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे दरम्यान योग्य वय नसताना तसेच मद्य प्राशन करुन वाहन चालविल्यामुळे देखील मोठ्या प्रमाणात अपघात झाले आहेत. दिवसेंदिवस वाहन अपघातांची मालिका सुरुच आहे मात्र त्यासाठी मागील कटु अनुभवातून धडा घ्यायला कोणीही तयार नाहीत हे वास्तव नाकारता येत नाही. आपल्या देशामध्ये विदेशी संस्कृतीचे फॅड वाढत चालले असून यामध्ये युवा वर्गाचा सहभाग मोठा आहे पर्यटन, हॉटेल, फार्म हाऊसवर थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी सर्वचजण ३१ डिसेंबरच्या रात्री - अपरात्री घराबाहेर पडतात तसेच काहीजण विविध देवदेवतांच्या दर्शनासाठी तीर्थयात्रा काढतात त्यामुळे वाहतूकीची कोंडी होवून एखाद्यावेळी जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच देशांमध्ये मोठ्या प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करुन हायस्पीडचे रस्ते बनविण्यात येत आहेत. त्यामुळे वाहने नॉनस्टॉप अतिजलद गतीने चालविल्यामुळे गाडीवरील चालकाचे नियंत्रण सुटून मोठ्या प्रमाणात अपघात झाल्याच्या देखील घटना घडल्या आहेत मात्र याकडे कोणीही गांभीर्याने लक्ष द्यायला तयार नाहीत हे असेच किती दिवस चालणारं ? असा प्रश्न निर्माण होतो आहे शेवटी काय "अती घाई,संकटात नेई" याचा प्रत्यय आल्याशिवाय राहणार नाही त्यासाठी आपण सर्वांनी वाहतूक विभागाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन आपलीही जबाबदारी म्हणून वाहन चालवले तर सर्वांचाचं आनंद द्विगुणित होईल !!

**राजू जाधव**
मांगूर जि.बेळगांव

# निसर्गाच्या सान्निध्यात रमा !



आधुनिक केसरी

माणूस हा निसर्गाचा भाग आहे. निसर्ग जे काही करतो. ते माणसाने केले पाहीजे.आपल्याला निसर्ग सतत भरभरून आनंद देत असतो. सुर्याकडून आपल्याला तेजोमय प्रकाश मिळतो. चंद्राकडून शितलता, तर नद्यांकडून पाणी मिळते. डोगरदऱ्यांवर झाडे वाढतात. पशुपक्षी वास करतात. खरोखर निसर्गाने आपल्याला खुप काही भरभरून दिलंय परंतू आपल्याला त्याची किंमत नाही. आपण निसर्गाच्या सान्निध्यात रमले पाहिजे. निसर्गाचा मनसोक्त आनंद घेतला पाहिजे. निसर्गसृष्टीत असणारे विविध रंग, विविध छटा आपल्याला दर्शवित असतात. कितीही गडद छटा असल्या तरी दुसर्या दिवशी झाडांची पाने अगदी बहरून येत असतात. पक्षांचा किलबिलाट, विविध रंगांची फुलपाखरे हे, आपले मनमोहुन घेतात. विविध रंगाची फुलझाडी, हिरव्यागार वनस्पती, नदी, नाल्यातून ओसंडून वाहणारे पाणी जणू काही निसर्गसृष्टी स्मितहास्य करून आनंद देण्यासाठी सज्ज असते. त्यासाठी वेळात वेळ काढून का होईना थोडं निसर्गाच्या सान्निध्यात फिरायला गेले पाहिजे. निसर्ग हा कितीही पैसे दिले तरी मिळणार नाही. आपल्याला सुख, समाधान, स्फुर्ती देण्याचं काम आजपर्यंत निसर्ग करत आला आहे. खरोखर निसर्गावर आपण भरभरून प्रेम केले पाहिजेत. निसर्गाने आपल्याला काही खुप काही दिले आहे त्याची गणती होऊ शकत नाही. आपल्यासाठी निसर्गाने खुप मोठी तरतुद करुन ठेवली आहे. अन्न,पाणी, हवा मुबलक प्रमाणात दिले आहे. फळ, पाने, पक्षी, वन्यजीव सृष्टी पाहून मन नक्कीच आनंदी होते. ताणतणाव दुर होतो. खरोखर निसर्ग आहे म्हणुन आपण आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. रोजच्याच दैनंदीन धकाधकीच्या आयुष्यात चार क्षण निवांत घालवायचे असतील तर निसर्गासारखे दुसरे कोणतेही ठिकाण नाही. त्यासाठी निसर्गाच्या सान्निध्यात रमायला हवे.

**संतोष दत्तू शिंदे**
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

# भविष्यातील तंत्रज्ञान बदलणारे जग.. आजोबा ते नातू पणतू..

आधुनिक केसरी


*(मागील अंकावरून)*
जुन्या संगणकाचे काय करायचे, हे ई भंगार कुठे विकायचे हा प्रश्न आहेच. बघता बघता VCR गेला! व्हिडिओ कॅसेट गेल्या. टेप रेकॉर्डर गेले. टाईप रायटर गेले. आता झेरॉक्स मशीन जायच्या मार्गावर आहेत. अनेकाकडे जुने ल्यांड लाईन फोन नाहीत. पत्र लिहिणे, पाठवणे, पोस्टमनची वाट बघणे केव्हाच मागे गेले.आजकाल वृत्तपत्रे देखील मोबाईलवर उपलब्ध झालीय. कोणे एके काळी मी खरगपूर ला असताना दोन दिवसाचा शिळा मराठी पेपर वाचत असे हौस म्हणून!आता तर कुठलीही माहिती, कुठलाही संदर्भ , कुठलेही पुस्तकं, कुठलेही गाणे इंटरनेटद्वारे मोबाईल वर सहज उपलब्ध होते. ही गुगल ची सर्व माहिती विश्वसनीय असते. बऱ्याच प्रमाणात. व्हॉट्स ॲपवर येणारे मेसेज अर्थातच अपवाद. तो गोंधळ मानव निर्मित म्हणून!

**आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञान..**
मेडिकलच्या क्षेत्रांत संगणकाची मदत ही गरुडझेप आहे. जेनेटिक इंजिनीअरिंगचा, बायो मेडिकलचा, बायोलोजीचा उचित उपयोग करून आता संगणकाने माणसाचे आरोग्य नियंत्रित करण्याचा विडा उचलला आहे. संगणकाची वाढती अदभुत मेमरी, अन् गणिती क्षमता यामुळे बरेच काही साध्य झाले आहे. आपण एखाद्या अच्ययावत मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये गेलो तर तिथली आधुनिक यंत्रणा बघून डोळे दिपतील.तरी बरेच संशोधन अजून आपल्याकडे आलेच नाही. जी सुधारणा, आधुनिकता आहे ती मोठ्या शहरापूर्तीच मर्यादित आहे. पण आपले सर्व आरोग्य मापन करणारे छोटेसे घड्याळ आता उपलब्ध आहे. आपली निद्रा, आपला रक्तदाब, साखरेचे प्रमाण, प्राणवायूचे प्रमाण,हृ दयाचे ठोके, ई सी जी या सर्व नोंदी या मनगटा वरील घड्याळात किंवा शरीरात ठेवलेल्या चिपमधून होऊ शकतात.त्याची नोंद डायरेक्ट मोबाईल वर होऊन त्या सर्व नोंदी आपण ईमेलने जगातल्या कुठल्याही तज्ञ डॉक्टर कडे पाठवू शकतो. तेही काही क्षणात! कॅन्सर सारख्या रोगासाठी तर संगणकाचा अन् तत्सम नॅनो टेक्नॉलॉजी चा उपयोग वरदान ठरला आहे. ज्या निदानासाठी पूर्वी अनेक दिवस,महिने वाट बघावी लागत असे, ते निदान आता काही क्षणांत होते.डॉक्टरच्या निदानात, ट्रीटमेंट मध्ये चुका होऊ शकतात.कारण ते सारे व्यक्ती सापेक्ष असते.तिथे कधी कधी भेदभाव असतो.संगणकाच्या निदानात ती शक्यता नसते.चुकाचे प्रमाण जवळपास नगण्य असते.आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून शस्त्रक्रिया म्हणजे शरीराचा भाग कापणे हेही टाळता येईल.जिथे आत रोग आहे, तिथे सूक्ष्म नालिके द्वारे पोहचून अचूक उपचार करता येईल. आताचे उपचार हे शरीराच्या चांगल्या भागावर देखील विपरित परिणाम करणारे असतात. उदा केमो थेरपीचा खूप त्रास होतो.वेदना सहन कराव्या लागतात,केस गळतात.आधुनिक संगणकाचे तंत्रज्ञान हे डायरेक्ट मर्मावर आघात करणारे, व्यथेचा अचूक शोध घेणारे असेल. कालानुरूप ते कमी खर्चिक देखील असेल. कसलीही किंमत ही त्या तंत्रज्ञानासाठी लागणाऱ्या साहित्यावर अन् बुध्दी संपदेवर अवलंबून असते. ते आर्थिक गणित नियंत्रणात आणता येते. कारोना काळात एरवी महागड्या लसी, मेडीसिन याच्या किंमती नियंत्रित झाल्याच ना? यामुळे पैसा तर वाचेल पण वेळ अन् त्रास देखील वाचेल. एक सोपे उदाहरणः पूर्वी दाताचा एक्सरे काढायचा तर आत एक फिल्म टाकत, त्या प्लास्टिक चा हिरड्यांना त्रास होत असे.नंतर ती फिल्म डेवलप करायला वेळ लागायचा.आता संगणकाशी जोडलेले आधुनिक तंत्र आत एक लहान नली घालून एका क्षणात सर्व बतीस दाताचा मागचा पुढचा एक्सरे काढतात एका क्षणात.अन् दुसऱ्या क्षणी तो रिपोर्ट संगणकाच्या पडद्यावर डेंटिस्ट बघू शकतो. तो रिपोर्ट तुमच्या मोबाईलवर देखील तेव्हाच उपलब्ध होतो!
रोबोटिक सर्जरी, टेली मेडीसिन, हे उपचार केव्हाच सुरू झाले आहेत. वरच्युलअल रियालिटी या प्रकारातून बरीच उलथापालथ होऊ घातली आहे. महाभारतातील मयसभा आता प्रत्यक्षात उतरते आहे. जी गोष्ट कधी घडलीच नाही ती घडल्याचा आभास तंत्रज्ञानाचा उपयोग करून शक्य आहे. मध्यंतरी यू ट्यूब वर लता मंगेशकर अन् सैगल यांनी गायिलेले द्वंद्व गीत प्रसारित झाले. ते त्यांनी कधी एकत्र गायिलेच नाही.वेगवेगळे गायिलेले गाणे तंत्राच्या मदतीने बेमालूम पणें मिक्स केले आहे. पुढे एखाद्या नव्या सिनेमात अनुष्का शर्मा बरोबर मीनाकुमारी दाखवली जाऊ शकते. आपण आपल्या परदेशातील मुलाबरोबर एकत्र पार्टी करू शकतो भारतात राहून!अनेक अशक्य वाटतील असे आभास निर्माण करता येतील.
क्रीडा क्षेत्रात संगणकाद्वारे अचूक निकाल दिला जातो. पंचाचे निर्णय चुकतील पण संगणक चुकणार नाही.ऑलिंपिक गेम मध्ये स्पर्धा खूप वाढल्या आहेत.त्यामुळे सेकंदाच्या अनेक भागाच्या फरकाने देखील अचूक निर्णय घोषित केले जातात. व्हिडिओ क्लिप स्लो मोशन मध्ये बघून प्रसिध्द खेळाडू कडून खूप काही शिकता येते.तेही घरच्या घरी,पैसे खर्च न करता!

**आळशीपणा वाढला..**
संगणकाने आपल्याला आळशी केले हे खरे. कारण इंटरनेट मुळे अर्धी अधिक कामे घर बसल्या होतात. बँक, रेल्वे, ऑफिस कुठेही न जाता घर बसल्या सर्व कामे होताहेत. त्यात पारदर्शी पणा आला. भ्रष्टाचार थोडा कमी झाला. इंधनाची,वेळेची बचत होते ती वेगळीच. अर्थात यामुळे अनेक रोजगार कमी झाले हे खरे. पण नवे रोजगार निर्माण झालेत हेही तितकेच खरे. ज्यांना काही नवीन शिकायचे आहे, नवे आव्हान स्वीकारायचे आहे त्यांना या नव्या संगणक तंत्र युगात खूप संधी आहेत.मी अमुक करणार नाही, मी नवे काही शिकणार नाही अशा आळशी पिढीला हे युग युसलेस म्हणजे नालायक ठरविणार! तरुणांना आपले मूल्य स्वतःच वाढवावे लागेल. त्यासाठी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील. सातत्याने नवे काही शिकावे लागेल. आजन्म शिकावे लागेल.

**माणूस हॅक झाला!**
आता कुठे गंभीर अपघात झाले तर तातडीची मदत मिळत नाही.त्यामुळे अनेकांना प्राण गमवावे लागतात.यापुढे तुमच्या शरीरावर कुठे तरी असणारी चिप तुमच्या अपघाताची माहिती जवळच्या डॉक्टर कडे पाठवू शकेल.केवळ अपघाताची माहिती नव्हे,तर तुमची त्यावेळची गंभीर परिस्थिती,तुमच्या शरीरातील बदल,तुम्हाला हवा असलेला रक्तगट अशी संपूर्ण माहिती जवळच्या मदत केंद्राकडे जाईल. तुम्हाला काही क्षणांत मदत उपलब्ध होईल. थोडक्यात काय तर तुम्ही स्वतःला जेव्हढे ओळखत नसाल,तेव्हढे संगणक तुम्हाला आतून बाहेरून ओळखेल.वेगळ्या शब्दांत माणूस पूर्ण यंत्राने हॅक झाला असेल! तुमची शारीरिक,मानसिक,आर्थिक,कौटुंबिक,अशी कुठलीही स्थिती गुप्त राहणार नाही.ती गूगल कडे उपलब्ध असेल. फेसबुक ला माहिती असेल.

**कृत्रिम बुद्धिमत्ता..**
माणसाची बुद्धी अन् संगणकाची बुद्धी याची



नेहमीच तुलना होत आली आहे.आपल्याला भावना आहेत.संवेदना आहेत. आपण स्पर्शाने बोलतो. आपले चेहरे बोलके आहेत असेही म्हणतो.आपले निर्णय परिस्थिती नुसार क्षणांत बदलू शकतात. संगणकाचे तसे नाही. त्याला जसे जितके शिकवले त्याप्रमाणेच तो चालणार. याच कारणामुळे भाषांतर करताना अजूनही संगणक चुकतो. प्रत्येक भाषेत असे अनेक शब्द असतात जे रचने प्रमाणे अर्थ बदलतात. माणसाच्या मेंदूची क्षमता खरेच अफाट आहे .अगम्य आहे. म्हणूनच लहान मुलेही परकीय भाषा लवकर शिकतात. संगणकाला प्रत्येक भाषेचे वैशिष्ट्य, सारे शब्द, उच्चार, त्यांचे वेगवेगळे अर्थ समजावणे तितके सोपे नाही. उदा माझ्याच पांढरीपांडे या आडनावाचे भाषांतर WHITE PANDE असे संगणक करू शकतो. काळे या आडनावाचे भाषांतर BLACK असे होईल! याचे कारण संगणकाला स्वतःची बुध्दी नाही. पण आता या अडचणीवर देखील मात होते आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता, मशीन लर्निंग ,म्यान मशीन सिस्टीम, या व तत्सम टेक्निकल तंत्रा मुळे बऱ्याच असंभव गोष्टी संभव होताहेत. शेवटी हसणे, रडणे, राग, लोभ, प्रेम, जिव्हाळा या भावना म्हणजे एक बायो केमिकल प्रोसेस असते.त्याचे विशिष्ठ क्रम असतात.ही बायो केमिकल,जेनेटिक,प्रोसेस समजून त्याप्रमाणे अल्गोरीथम तयार करून संगणकाला प्रेरित केले तर तोही परिस्थिती प्रमाणे हसणे,रडणे,राग लोभ या भावना दर्शवू शकेल असा दावा केला जातो. पण इथेही अडचणी आहेत. चुका होऊ शकतात.प्रत्येक माणसाच्या राग लोभ व्यक्त करण्याच्या पद्धती वेगळ्या असतात. काही जण मोठ्याने बोलतात. त्यांचा आवाजच तसा असतो.याचा अर्थ ते रागावले असतात असे नव्हे! संगणकाला हे सारे बदल,ही भावनिक गुंतागुंत समजावणे,त्या नुसार ट्रेन करणे सोपे नाही. प्रेमिकेचा नकार हा मुळात होकार असतो असे आपण समजतो. काही गोष्टी स्पष्ट बोलायला लाज आड येते. हे सारे संगणकाला कसे समजावयाचे ही अडचण आहेच. आपल्या स्मृतीत गरजेनुसार काही आठवणे, काही विसरणे,विसरलेले प्रयत्न करून आठवणे, ही सारी परमेश्वराची देणं आहे. हे सारे जसेच्या तसे संगणकास अशक्य आहे. न्युरो सायन्स,नॅनो टेक,बायो इन्फो टेक,आणि संगणक प्रणाली, वायरलेस टेक्नॉलॉजी याच्या संयुक्त अभ्यासाने बऱ्याच अशक्य गोष्टी शक्य होताहेत. आता नवे हृदय,नवी किडनी , नवे लिव्हर प्रत्यारोपण करणे शक्य होणार आहे.बरेच प्रयोग यशस्वी झालेत. अर्थात या संशोधनाला चाप बसवणारे अनेक घटक आहेत. यातून नैतिक, कायद्याच्या समस्या निर्माण होतील. काही चुकले, विपरित घडले तर दोषी कुणाला ठरवायचे, शिक्षा कुणाला द्यायची हे समस्या निर्माण होईल. कारण या तंत्रज्ञानाच्या विकासात अनेक हात असतील. तेव्हा चुकीची जबाबदारी नेमकी कुणी घ्यायची, तसेच श्रेय ,पेटंट नेमके कुणाला द्यायचे हेही प्रश्न निर्माण होतील.त्यातून वाद, लढाया होतील! एक दुसरा ही गमतीचा भाग आहे. लिव्हर हे दारू पिल्याने खराब होते. पण दुसरे नवे लिव्हर उपलब्ध आहे म्हंटल्यावर लोक जास्त दारू प्यायला लागतील. त्याचे विपरीत परिणाम होतील. विज्ञानाचा नियमच आहे. काहीतरी नष्ट झाल्या शिवाय नवे काही निर्माण होत नाही. हा देण्या घेण्याचा व्यवहार असतो. काही नवे हवे तर त्यासाठी वेगळे मूल्य द्यावेच लागते.काही तरी त्यागावे लागते.फुकटात काहीच मिळत नाही. इंटरनेट ने जग जवळ आले हे खरे.पण त्या बदल्यात माणसे दुरावलीत हेही तितकेच खरे! तंत्रज्ञान विकासाचा विचार करतांना,मानवी भावना,निसर्गाचे संतुलन, मदर नेचर, परमेश्वर यांचे अस्तित्व विसरून चालणार नाही!

**मानसिक स्वास्थ्य..**
तरी या शतकाच्या शेवटी शेवटी संगणक माणसाच्या मनाचा वेध घेईल.ताबा देखील घेईल. शेवटी मनाचे नियंत्रण हे मेंदूच्या अती सूक्ष्म विद्युत लहरी द्वारेच होते. आपल्या भावना,वेदना,राग लोभ, आनंद , दुःख हे या न्यूरो वाहिन्यातील संदेशांच्या देवघेवीतूनच होते.हा आतला ताबा आता बाहेरच्या संगणकाला देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मानसिक आजारा साठी इलेक्ट्रिक शॉक देण्याची प्रथा आहेच.त्याची पुढची पायरी. FMRI म्हणजे फंक्शनल म्यागनेटीक रेझोनांस इमेजिंग, द्वारे मेंदूतील अती सूक्ष्म बदल पडद्यावर दिसतील. त्यांचे विश्लेषण करून नैराश्य,मानसिक ताण, एव्हढेच नव्हे तर,विचार पद्धत या सर्वाचा अभ्यास करून सारे काही सुरळित, पूर्ववत किंवा अधिक चांगले करण्यासाठी उपाय शोधता येतील. आपल्या स्वप्नांचे चित्रीकरण करता येतील, त्यांचे नेमके अर्थ, मूळ शोधता येतील. पण माणसाच्या मनाचा शोध घेणे, आतपर्यंत पोहोचणे हे सारे कितपत नैतिक आहे हा कायद्याचा प्रश्न उरतोच.हा सगळा देवाचे अधिकार स्वतः कडे घेण्याचा,निसर्ग नियमात ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न आहे.त्याला अनेक देशांचा, धर्माचा विरोध असणार,आहेच. तरी ही टेली कायनेटिक शक्ती संगणकाचा उपयोग करून स्वतःकडे घेण्याचे प्रयोग सुरूच आहेत. लोकांनी चंद्रा मंगळावर जाण्यासाठी आरक्षण केले आहेच की! पण प्रत्येक लाभा मागे धोके देखील असतात. कधी कधी लाभा पेक्षा तोटेच जास्त असतात. लाभ चटकन दिसतात.तोटे दिसत नाहीत सहजासहजी.. ते सुरवातीला अदृश्य असतात. तंत्रज्ञान वापरतांना आपण किती सजग असतो हे महत्वाचे. संगणकाचे फक्त लाभ आपल्या पर्यंत पोहोचतात. पण त्याचे अदृश्य परिणाम,त्या मागचे धोके हे संशोधकांनाच माहिती असतात. कधी कधी ते आपल्यापासून लपवले जातात.बघता बघता आपण व्हॉट्स ॲप,फेसबुक,गुगल,ट्विटर च्या आहारी गेलो. आपण एरवी स्वातंत्र्याच्या गप्पा करतो. पण आपण स्वतःच या तंत्रज्ञानाच्या आहारी जाऊन परतंत्र झालो त्याचे काय?तुमचा फक्त मोबाईल हॅक नाही झाला, तुम्ही स्वतःच हॅक झालाय.. तुमच्या नकळत!!

**डॉ. विजय पांढरीपांडे**
संपर्क क्र. 7659084555

# राजवाडे युग आणि महाराष्ट्रातील इतिहास मीमांसा



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592


आधुनिक केसरी

**इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी पुण्यामध्ये भारत इतिहास संशोधन मंडळ व धुळ्यात राजवाडे संशोधन मंडळ ही संस्था स्थापन केली. पुण्यातील भा.इ.सं. मंडळाच्या इमारतीचे पुनरुज्जीवन होत आहे, त्यानिमित्ताने हा लेख. इतिहास हा शब्द 'हिस्टोरिया' या लॅटीन शब्दापासून बनला आहे ज्याचा अर्थ 'चिकित्सा करून मिळविलेले ज्ञान' असा होतो. इतिहासाची मांडणी आणि लेखन इतिहासकार कोणत्या दृष्टीने करतात आणि त्यांच्या लेखनावर स्थल-काल व घटनांचा कसा प्रभाव पडतो? साधन सामुग्रीचे संकलन व विश्लेषण इतिहासकार कशाप्रकारे करतात? याबाबततची चर्चा व चिकित्सा इतिहासमीमांसाशास्त्रात केली जाते. या शास्त्रातील पद्धती, प्रमेय आणि प्रणाली यांचा विचार करून इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासमीमांसेत नवे युग निर्माण केले. त्यांच्या ह्या युगप्रवर्तक कार्याची मीमांसा प्रस्तुत लेखात केली आहे.**

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१८६३-१९२६) यांनी भारतीय इतिहासलेखनशास्त्रामध्ये मोलाची भर टाकली आणि आधुनिक महाराष्ट्राशी इतिहासमीमांसेत एक नवे युग निर्माण केले. केवळ महाराष्ट्रापुरतेच नव्हे तर भारतीय इतिहासमीमांसेचाही विचार करता, ऐतिहासिक साधनांचे शास्त्रीय संकलन, जुळणी, वर्गीकरण आणि प्रकाशन अशा विविध अंगानी विचार करता, त्यांनी ऐतिहासिक संशोधनपद्धतीस एक नवी कलाटणी दिली आणि मराठ्यांच्या इतिहासाला राष्ट्रीय इतिहास विश्वात मानाचे स्थान प्राप्त करून दिले, त्यामुळे त्यांची गणना विसाव्या शतकातील प्रमुख भारतीय इतिहासकारांमध्ये केली जाते. त्यांच्या योगदानाचे प्रस्तुत लेखात सूत्ररूप विवेचन केले आहे...







तिहास मीमांसेमध्ये साधनचिकित्सा हा एक महत्त्वाचा निकष मानला जातो. त्यानुसार साधनांची अंतर्गत व बाह्य समीक्षा केली जाते. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी प्रकाशित केलेली ऐतिहासिक कागदपत्रे व दस्तावेज यांचे मोल अनन्यसाधारण आहे कारण अंतर्गत व बाह्य समीक्षा या दोन्ही निकषांचा विचार करता त्यांनी शोधलेली कागदपत्रे व बखरी ह्या 'मराठी साम्राज्याचा इतिहास लिहिण्यासाठी उपयुक्त ठरल्या आहेत. भारतीय उपखंडातील इतिहास संशोधनाचा विसाव्या शतकात जो आढावा घेण्यात आला त्यामध्ये वि. का. राजवाडे यांच्या ऐतिहासिक कार्याची नोंद देशी आणि विदेशी अभ्यासकांनी सुद्धा घेतली आहे. राजवाडे यांनी प्रकाशित केलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' ह्या २२ खंडांचे आलोडन केल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास समग्रपणे लिहिला जाऊ शकत नाही. यातच राजवाडे यांच्या कार्याचे वैशिष्ट्य लक्षात येते.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी आपल्या समग्र जीवनकाळात इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भाषाशास्त्र, सांस्कृतिक मानववंश शास्त्र इ. अनेक अंगांनी समृद्ध असे संशोधन केले. त्यांच्या व्युत्पन्न आणि चौफेर प्रतिभेचा प्रत्यय त्यांनी लिहिलेल्या अनेक ग्रंथांतून प्रकट होतो. कुठल्याही विषयाकडे पाहताना केवळ एकांगी नव्हे तर अनेक पैलूंनी शास्त्रीय आधार घेऊन विचार केला पाहिजे अशी त्यांची दृष्टी होती. इतिहास म्हणजे केवळ गतकालीन घटनांची जंत्री नव्हे, तर समग्र समाजाचे दर्शन घडविणारी प्रक्रिया होय. इतिहास म्हणजे केवळ घटना, प्रसंग, राजकारण, सत्तांतरासाठी झालेली कटकारस्थाने यांचाच समावेश होतो असे नाही तर सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचे सर्वांगीण दर्शन म्हणजे इतिहास होय, अशी त्यांची धारणा होती.. पुरातत्व विद्या आणि मानववंश शास्त्राची सुद्धा त्यांना यथार्थ जाण होती. 'महाराष्ट्राचा वसाहतकाळ' हा त्यांचा ग्रंथ ह्यादृष्टीने महत्त्वाचा ठरतो. राजवाडे यांनी संस्कृत धातू कोष, व्युत्पत्ती शास्त्र याबाबत केलेले संशोधनसुद्धा इतिहासाला पोषक ठरले. ज्ञानेश्वरीची सर्वांत जुनी प्रत शोधून ज्ञानेश्वरीतील 'मराठी भाषेचे व्याकरण' ही त्यांनी लिहिलेली विवेचक प्रस्तावना त्यांच्या वाङ्मय इतिहास दृष्टीचे जाणीव करून देणारी आहे.

**२) युगप्रवर्तक कार्य :** भारतीय इतिहासमीमांसा क्षितिजावर राजवाडे यांचे कार्य एखाद्या स्वयंभू तेजस्वी ताऱ्याप्रमाणे चमकत राहिले आहे. प्रा. रामशरण शर्मा यांनी म्हटल्याप्रमाणे, 'राजवाडे यांची निर्भेळ, निःस्पृह व निर्मोही संशोधनदृष्टी ही वाखाणण्याजोगी होती. ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, संस्कृत भाषेतील सामुग्री इ. चा अव्याहत रात्रंदिवस परिश्रमपूर्वक शोध घेऊन त्या आधारे त्यांनी २२ खंड प्रकाशित केले. त्या काळातील प्रतिकूल परिस्थिती, वाहतूक साधनांचा अभाव, सामाजिक व आर्थिक अडचणी लक्षात घेता ऐतिहासिक साधनांचे जतन, संवर्धन आणि विश्लेषण या संदर्भात त्यांनी केलेल्या ऐतिहासिक कार्याचे वैशिष्ट्य स्पष्ट होते. आयुष्यभर गावोगावी करून गावोगावी, खेडोपाडी आरि दुर्गम भागात भ्रमंती करूनत्यांनी मिळविलेली कागदपत्रे आणि संग्रहीत केलेल्या पुराणवस्तू यांचा विचार करता पहिल्या पिढीतील संशोधकाला जो संघर्ष करावा लागतो तो त्यांनी मोठ्या निष्ठेने केला. त्यांच्या हयातीमध्ये राजवाडे यांच्या विद्वत्तेचा व ज्ञानसंग्राहक वृत्तीचा संबंध महाराष्ट्रात दरारा प्रस्थापित झाला. राजवाडे जणू एक दंतकथा व आख्यायिका बनले. त्यांच्या ऐतिहासिक कार्याचे तीन पैलू स्पष्ट होतात. पहिला म्हणजे त्यांनी महाराष्ट्रात इतिहास संशोधनास आवश्यक सामुग्री उपलब्ध केली व ती प्रकाशित केली. त्यामुळे इतिहास संशोधनाचा पाया घातला गेला. दुसरे म्हणजे संशोधकास आवश्यक अशा प्रतिभाशक्तीचे आणि प्रगाढ आत्मविश्वासाचे दर्शन घडवून त्यांनी संशोधकांपुढे नवा आदर्श निर्माण केला. तिसरे असे की, तथ्य संकलनाप्रमाणेच तथ्यांचे शास्त्रीय व चिकित्सक विश्लेषण ही सुद्धा एक महत्त्वाची पायरी आहे हे त्यांनी स्वतःच्या महत्प्रयासाने दाखवून दिले.

**३) मौलिक योगदान :** वि. का. राजवाडे यांच्या ऐतिहासिक संशोधन कार्याचे मौलीक योगदान स्पष्ट करताना पुढील प्रमुख पैलूंवर भर द्यावा लागेल :-

१. इतिहास संशोधन हेच जीवनकार्य अशा निष्ठेतून त्यांनी केलेले अविश्रांत संशोधन व विश्लेषण है। सह्याद्रीच्या शिखराएवढे उत्तुंग ठरले आहे. पुणे प्रांतातील लोहगड येथील किल्लेदाराच्या कुळात जन्मलेले विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचे प्रारंभिक जीवन खडतर आणि कंटकमय होते. जन्मगाव वरसई, काकांचे वडगाव ते पुणे अशी वाटचाल करत त्यांनी १८८२ साली मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर अहर्निश अध्ययनाचा मार्ग अनुसरला. १८९० मध्ये त्यांनी डेक्कन कॉलेज या नामंकित संस्थेतून बी.ए. या पदवीचे शिक्षण पूर्ण केले. वि.कृ.चिपळूणकर, रा. गो. भांडारकर तसेच कोषकार परशुरामतात्या गोडबोले यांच्याकडून त्यांना अध्ययन व संशोधनाची प्रेरणा मिळाली. डेक्कन कॉलेजचे ग्रंथालय त्यांनी आपल्या अहर्निश वाचन-चिंतनातून जणू आत्मसात केले होते. या काळात त्यांनी राज्यशास्त्र, समाजशास्त्रातील मूलभूत सिद्धांतांची उजळणी करून भक्क अशी तात्वीक बैठक निर्माण केली. २. डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असताना वाचन, मनन व चिंतनाचे तसेच चिकित्सक लेखनाचा मार्ग स्वीकारला. कोकणच्या भूमीतील चिवटपणा व प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत त्यांचे जीवनशिल्प कोरले गेले.' बी. ए. पदवी घेतल्यानंतर त्यांनी काही काळ पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाचे काम केले. त्यांच्यावर झालेले राष्ट्रीय विचारांचे संस्कार त्यांच्या भावी जीवनाला आकार देणारे ठरले. या काळात लोकमान्य टिळकांच्या 'स्वराज्य, स्वदेशी व राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार' या चतुःसूत्रीचा बहिष्का त्यांच्यावर पडला. काही वेळात ते स्वतःला टिळकांच्या विचारांचे अनुयायी असल्याचे नमूद करत आणि टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी राजकीय नेतृत्वाची तयारी सुद्धा दाखवली होती असे लोकनायक बापूजी अणे यांनी नमूद केले आहे.

३. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी असा त्यांचा आग्रह होता. ते म्हणत असत, “त्यांना (विदेशी संशोधकांनी) ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील, माझ्या ग्रंथाची पूजा करतील, मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तीला हपापलेलो नाही. यावरून स्वभाषा, स्वधर्म व स्वसंस्कृतीचा रास्त अभिमान हा त्यांच्या लेखनाचा आधार असल्याचे दिसते. त्यासाठी त्यांनी मराठी भाषेत अध्ययन व संशोधनाचा यथार्थ मार्ग अनुसरला. त्यांनी मराठी भाषेत इतिहास आणि भाषाशास्त्र विषयक संशोधनाचा भक्कम पाया घातला आणि स्वतः प्रकाशित केलेल्या 'भाषांतर' या मासिकाप्रमाणेच अन्य नियतकालीकातून कोल्हापूर आणि महाराष्ट्रातून इतरत्र प्रकाशित होणाऱ्या अन्य नियतकालीकांतून त्यांनी यथार्थ लेखन केले. त्यामुळे 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' यासारख्या अजोड समाजशास्त्रीय ग्रंथाची चिकित्सक दृष्टीने शास्त्रीय मांडणी ते करू शकले. हा ग्रंथ भारतीय समाजशास्त्र संशोधनात एक मैलाचा दगड ठरला आहे आणि भारतातील बहुआयामी व व्यामिश्र सामाजिक संस्थांच्या अभ्यासासाठी तो वस्तुपाठ ठरला आहे. " ४. सन १८९५ मध्ये 'भाषांतर' हे मासिक त्यांनी आरंभिले. त्याद्वारे त्यांनी इतिहासकार व तत्त्वज्ञ प्लेटो, ॲरिस्टॉटल, एडवर्ड गिबन यांचे साहित्य मराठी भाषेत अनुवादीत केले. त्यामुळे मराठी भाषा व संशोधन क्षेत्रात एक नवे दालन सुरु झाले. कोल्हापूर येथून प्रकाशित होणाऱ्या 'समर्थ', तसेच 'ग्रंथमाला', 'विश्ववृत्त', 'सरस्वती मंदिर', 'प्राचीप्रभा' इ. दर्जेदार नियतकालिकांतून त्यांनी अव्याहतपणे लेखन केले. त्यांचे हे सर्व लेखन अद्यापही संशोधकांची वाट पाहात आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संपादन केलेल्या लेखसंग्रहात त्यांच्या बहुआयामी प्रतिभाशक्तीचे यथार्थ प्रतिबिंब उमटले आहे.

**क्रमशः**

# लुई ब्रेल: ब्रेल लिपीचे जनक !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**जगभरात आता अंध किंवा दृष्टिहीन मुले ब्रेल पाटीच्या सहाय्याने ब्रेललिपी लिहायला आणि वाचायला शिकतात. ती लिपी लिहायला आणि वाचायला खुप सोपी असून त्यावर अंक लेखनसुद्धा केले जाते. तिचा वापर खुप सोपा, सरल व सहज आहे. त्यांचे जगभरातील अंध आणि दृष्टिहीन लोकांसाठी हे खुप महत्वाचे कार्य आहे. ते हेच लुई ब्रेल एक जगप्रसिद्ध शासत्रज्ञ होऊन गेले. त्यांच्याबद्दल ज्ञानवर्धक सविस्तर माहिती अलककार- श्री कृष्णकुमार निकोडे गुरूजींच्या शब्दांतून जरूर वाचा.**

लुई ब्रेल हे फ्रेंच शास्त्रज्ञ, लेखक, स्वयंसेवक व शिक्षक होते. त्यांनी अंध व्यक्तींसाठी बोटांच्या सहाय्याने वाचनाची पद्धत व लिपी विकसीत केली. दोन बहिणी आणि एका भावाच्या पाठी जन्मलेले लुई सगळ्यांचे लाडके होते. लुईच्या वडिलांची स्वतःची कार्यशाळा होती आणि ते दिवसभर आपल्या कार्यशाळेत कार्यमग्न असत. चालायला लागल्यापासूनच लुई आपल्या वडिलांसह त्यांच्या कार्यशाळेत जात आणि वडिलांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत असत. वडिलांचे छोट्या लुईकडे सतत लक्ष राहत असे आणि ते त्याला आपल्या हत्यारांपासून दूर ठेवत असत. लहानपणापासून लुई स्वावलंबी होते. ते स्वतःची कामे स्वतःच करीत असत. अभ्यासात लुई हुशार होते, केवळ श्रवणाच्या जोरावर त्यांनी केलेली प्रगती पाहून अनेकांना आश्चर्य वाटे. लुई अत्यंत शांत स्वभावाचे होते. त्यांनी सर्वच विषय विद्यार्थ्यांना शिकवणे सुरू ठेवले. आयुष्यभर शिक्षण देण्याचे कार्य करत अनेक विद्यार्थ्यांप्रती त्यांचे मदतीचे हात होते. त्यांनी आपल्या सर्व वस्तू विद्यार्थ्यांना भेट देऊन जगाचा निरोप घेतला होता.

लुई ब्रेल यांचा जन्म कुपव्रे या खेड्यात दि.४ जानेवारी १८०९मध्ये एका गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडील सायमन रेने ब्रेल हे एक कातडी वस्तू तयार करणारे कारागीर होते. लुई ब्रेल यांच्या आईचे नाव मोनिक ब्रेल होते. कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी सायमन यांना खुप कष्ट करावे लागत असे. जेव्हा लुई फक्त तीन वर्षाचा होते, तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना आपल्यासोबत कामावर घेऊन जात. त्याठिकाणी लुईचे वडील कातडी शिवण्याचे काम करत असत. घोड्याचे खोगीर बनवण्याचे काम करत असत. इ.स.१८१६मध्ये त्यांच्या गावात एक शिक्षक आले, त्यांचे नाव एयबे जॅक पाद्री पेलू असे होते. त्यांनी शिकवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. वासाच्या आणि स्पर्शाच्या सहाय्याने वेगवेगळ्या वस्तूंची ओळख शिकवली. लुई ब्रेल लहान असल्याने ते त्यांच्याजवळ असणाऱ्या वस्तूंशी खेळत होते. जसे त्यांचे वडील कामासाठी लोखंडाचे तुकडे, घोड्याचे नाल, कठीण लाकूड, दोऱ्या, चाकू, सुई इत्यादी ठेवत, ते त्या वस्तूंशी खेळत असत.

एकदा असेच खोगीर तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी टोकदार आरी खेळताना लुईच्या डोळ्यात घुसली. डोळ्यातून रक्त येऊ लागले. त्याचावर जवळच्या डॉक्टरकडे उपचार केले, परंतु डोळ्याला संसर्ग झाला. एका डोळ्याचा संसर्ग दुसऱ्या डोळ्याला झाला, त्यामुळे ते दृष्टिहीन झाले. लुई ब्रेल लहानपणापासून हुशार होते. त्यांना





त्यांच्या आईवडीलांकडून नेहमी प्रोत्साहन मिळत असे. ते स्पर्श आणि वासाच्या सहाय्याने अनेक वस्तू सहज ओळखत असत. पुढे त्यांना सामान्य शाळेत पाठवण्यात आले. केवळ श्रवण करून त्यांनी आपल्या अभ्यासात प्रगती गाठली. पुढे दोन वर्षांनंतर त्यांना पॅरीसमधील शाळेत घालण्याचे त्यांच्या शिक्षकाने ठरवले. लुई अत्यंत शांत, संयमी, हुशार होते. त्यांचे त्या शाळेत घनिष्ट नाते जोडले गेले. त्यांनी आपल्या आयुष्यभर शिक्षण देण्याचे कार्य केले. त्यांनी अंध व्यक्तींसाठी खूप मोठे कार्य केलेले असून आजही लुई ब्रेल यांची अंधासाठी वापरण्यात येणारी ब्रेल लिपी संपूर्ण जगभर वापरण्यात येत आहे. इ.स.१८२१ साली अंधांना लिहाण्या वाचण्यासाठी ब्रेल लिपीचा शोध लावणारे पहिले शस्त्रज्ञ म्हणून लुई ब्रेल यांची जगभरात वेगळी ओळख आहे. त्यांच्या नावावरून या लिपीला ब्रेल लिपी असे नाव दिले गेले. त्यांना ब्रेल लिपीचे जनक म्हणतात. ४ जानेवारीला संपूर्ण जगात जागतिक ब्रेल दिन साजरा केला जातो. कारण हा दिवस लुई यांचा जन्मदिन आहे. त्यांचे शिक्षक पाद्रेंनी त्यांना पॅरीस येथे अंध मुलांच्या शाळेत प्रवेश मिळवून दिला. जगातील पहिल्या अंध मुलांच्या शाळेत लुई सर्वात लहान विद्यार्थी होता. इतिहास, भूगोल, ग्रीक, संगीत, गणित आदी विषय ते सहजपणे शिकले. त्याच शाळेत शिक्षण घेऊन तेथेच शिक्षक म्हणून रुजू झाले. अंध व्यक्तींना वाचण्या-लिहण्यासाठी ब्रेल लिपी हे एकमेव साधन आहे. पंधराव्या वर्षी अंध झालेल्या लुईंनी हाताच्या स्पर्शाने जाणवणाऱ्या चिन्हांची निर्मिती केली. हाताने जाणवणाऱ्या चिन्हाची पुढे ब्रेल लिपी तयार केली. सन १८५४ मध्ये या लिपीचा प्रचार आणि प्रसार झाला. भारत सरकारने लुई ब्रेल यांच्या जन्म शताब्दीच्या दिवशी सन २००९ साली त्यांचे नाणे प्रसिद्ध केले. ब्रेल लिपीमध्ये एकूण सहा ठिबक्यांचा सेट असतो. खोलगट आणि फुगीर ठिबक्यांच्या सहय्याने हे चिन्ह बनवले जातात, त्याचा हाताला स्पर्श जाणवतो. हे ठिबके कधी कागदाच्या वरील बाजूला तर कधी खालील बाजूस जाणवतात. ही लिपी लिहण्यासाठी ब्रेल पाटी विकसित करण्यात आलेली आहे.

जगभरात आता अंध किंवा दृष्टिहीन मुले ब्रेल पाटीच्या सहाय्याने ब्रेललिपी लिहायला आणि वाचायला शिकतात. ती लिपी लिहायला आणि वाचायला खुप सोपी असून त्यावर अंक लेखनसुद्धा केले जाते. तिचा वापर खुप सोपा, सरल व सहज आहे. त्यांचे जगभरातील अंध आणि दृष्टिहीन लोकांसाठी हे खुप महत्वाचे कार्य आहे. ते हेच लुई ब्रेल एक जगप्रसिद्ध शासत्रज्ञ होऊन गेले. या महान संशोधकाचा मृत्यू दि.६ जानेवारी १८५२मध्ये झाला.

!! लुई ब्रेल यांच्या अविस्मरणीय कामगिरीस अदबीने सॅल्यूटऽऽऽ.. !!

# जी आय वन हॉस्पिटलचा तिसरा वर्धापन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जी आय वन हॉस्पिटल, पोट व लिव्हर विकार संस्था यांचा तिसरा वर्धापन दिन ४ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ३ वर्षांपूर्वी जी आय वन रुग्णसेवेचा प्रारंभ करण्यात आला होता. मेडिकल गॅस्ट्रोएन्टरोलॉजिस्ट डॉ. वैभव गंजेवार, डॉ. अशोक मोहिते, डॉ. विनय झंवर, आणि सर्जिकल गॅस्टोएन्टरोलॉजिस्ट डॉ. संदीप भालसिंग, डॉ. मुकेश राठोड ह्या पाच नामवंत गस्त्रोइंटेरोलॉजीस्टनी मिळुन हेहॉस्पिटल सुरु केले. त्याला ४ जानेवारी २०२३ रोजी तीन वर्ष पूर्ण होऊन, चौथ्या वर्षात यशस्वी पदार्पण करीत आहे. जी आय वन हॉस्पिटल वर्धापन दिनानिमित्त जी आय वन हॉस्पिटल आणि LIONS ब्लड बैंक, औरंगाबाद याच्या संयुक्त विदयमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचारी मिळून ३४ जणांनी रक्तदान केले. यावेळी LIONS ब्लड बैंक चे पदाधिकारी डॉ. प्रकाश पाटणी सर, श्री. अनिल लुनियाजी यांची उपस्थिती होती. जी आय वन हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम देखील करण्यात आला तसेच कर्मचार्यांसाठी स्नेहभोजन व खेळाचे आयोजन केले होते. सर्वांच्या सहकार्याने आणि सहभागाने हे हॉस्पिटल भविष्यात आणखी प्रगती करून आणि रुग्णांना अविरत व उत्तम सेवा देण्याचे ध्येय ठेऊन मराठवाड्यातच नव्हे तर महाराष्ट्रात ह्या हॉस्पिटल चे नाव मोठे होईल असा संकल्प करून या प्रसंगी सर्व संचालकामार्फत संदेश देण्यात आला. तसेच नवीन उपचार पद्धती फाइब्रो स्कॅन, लेजर, एंडोस्कोपीक अल्ट्रा साऊंड, आय आर लेप्रोस्कोपीक याबाबत माहिती देण्यात आली.



# मुंबई व महाराष्ट्राचे महत्व कमी करण्यासाठी योगी आदित्यनाथांना पायघड्या : नाना पटोले

## उत्तर प्रदेशातील गुंतवणूकीसाठी मुंबईत 'रोड शो' ची काय गरज?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य असून मुंबई हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शहर आहे. मुंबई व महाराष्ट्राचे महत्व करणे हे भाजपाचे षडयंत्र असून गुजरातला उद्योग पाठवल्यानंतर आता भाजपाशासित उत्तर प्रदेशमध्ये महाराष्ट्रातील गुंतवणूक पाठवण्याचा कुटील डाव आहे. केंद्र सरकारच्या इशाऱ्यावर महाराष्ट्रातील ईडी सरकार काम करत असून त्याचाच एक भाग म्हणून गुंतवणुकीच्या नावाखाली उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासाठी ईडी सरकार पायघड्या घालत आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, उत्तर प्रदेशातील कायदा व सुव्यवस्था अत्यंत खराब आहे. योगी आदित्यनाथ यांचे सरकार स्वतःच न्यायालय व न्यायाधीश असल्याच्या अविर्भावात बुलडोझर चालवून गोर गरिब व सामान्य माणसांची घरे जमीनदोस्त करते. महिला, अल्पसंख्याक, दलित समाज योगींच्या राज्यात सुरक्षित नाही, ते भयभित होऊन जीवन जगत आहेत. योगी आदित्यनाथ हे धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण करतात आणि ज्या राज्यात धर्माच्या नावावर राजकारण केले जाते व सरकार चालवले जाते त्या राज्यात कोणता उद्योगपती गुंतवणूक करण्यास धजावेल ? पण महाराष्ट्रातील ईडी सरकारच्या मदतीने उत्तर प्रदेशात गुंतवणूक वाढावी यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या भाजपाशासित राज्यातील गुंतवणूक वाढावी व महाराष्ट्राचे महत्व कमी व्हावे यासाठीच महाविकास आघाडीचे सरकार पाडून ईडीचे सरकार आणले आहे, असे वाटते. मुंबईतील फिल्म उद्योगावर योगी आदित्यनाथ यांचा डोळा आहे. हा उद्योग उत्तर प्रदेशमध्ये घेऊन जाण्यासाठी याआधीही भाजपाकडून अनेक खटपटी करण्यात आल्या. मविआचे सरकार असताना अनेक निर्माते, अभिनेते व अभिनेत्रींना बदनाम करून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला गेला. मुंबईतील चित्रपटसृष्टी नशाबाजांचा अड्डा असल्याचे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. आता पुन्हा एकदा चित्रपट उद्योग उत्तर प्रदेशात घेऊन जाण्याचा प्रयत्न होत असून त्याला राज्यातील खोके सरकार मदत करत आहे. उत्तर प्रदेशातील गुंतवणूक वाढावी यासाठी उद्योगपतींना आवाहन करण्यासाठी मुंबईत आल्याचा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा दावा आहे.

# अखेर राम मंदिराची तारीख ठरली

आधुनिक केसरी न्यूज

**त्रिपुरा :** येथे भाजपाची जन विश्वास यात्रा सुरु आहे. या सभेत बोलत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अयोध्या येथे निर्माणाधीन असलेल्या राम मंदिराची तारीख जाहीर केली आहे. त्यांनी सांगितले की, १ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिर तयार होईल.त्रिपुरामधील लोकांनी आताच तिकीट बुक करुन ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. अमित शाह म्हणाले की, २०१९ साली मी भाजपाचा अध्यक्ष होतो. तेव्हा राहुल गांधी काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते रोज विचारायचे की, मंदिर वहीं बनाएंगे, तिथि नहीं बताएंगे. तर राहुल गांधी आता कान उघडून ऐका, १ जानेवारी २०२४ रोजी अयोध्यामध्ये गगनचुंबी राम मंदिर तुम्हाला पाहायला मिळेल. अमित शाह यावेळी म्हणाले की, "फक्त राम मंदिरच नाही, तर एक-दोन वर्ष जाऊद्या माँ त्रिपुरी सुंदरी देवीचेही भव्य असे मंदिर बनवू. ते पाहण्यासाठी जगभरातून लोक इथे येतील. आम्ही काशी विश्वनाथ कॉरिडोर बनवला. महाकाल कॉरिडोर बनवला. सोमनाथ आणि अंबा मातेचे मंदिर सोन्याचे होत आहे. माँ विंध्यवासिनीचे नवीन मंदिर बनत आहे. अनेक वर्ष प्रलंबित असलेला राम मंदिराच्या उभारणीवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केल्यानंतर मंदिराच्या बांधकामाला सुरुवात झाली होती. ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येत राम मंदिराच्या बांधकामासाठी भूमिपूजन केले आणि मंदिराची पायाभरणी केली. आता १ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत राम मंदिर बांधून पूर्ण होईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली आहे. श्रीराम जन्मभूमी ट्रस्टचे सदस्य डॉ. अनिल मिश्र यांनी सांगितले की, मंदिर निर्माण करण्याचे काम जलदगतीने सुरु आहे.




# वाळूज येथे सावित्रीच्या लेकींचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती तथा महिला मुक्ती दिनाचे औचित्य साधून महावितरणच्या वाळूज शहर उपविभागातर्फे उपविभागातील सर्व महिला कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. महावितरणमधील महिला कर्मचारी आपल्या सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडत आहेत. महावितरणच्या व पर्यायाने महाराष्ट्राच्या विकासामध्ये महिला कर्मचारी मोलाची भूमिका बजावत आहेत. याचे सर्व श्रेय सावित्रीबाई फुले यांचा त्याग व परिश्रमास जाते, असे प्रतिपादन उपविभागाचे प्रमुख तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रवीण जोशी यांनी केले. यावेळी सहायक अभियंता मिरगणे, अमोल



औताडे, कृष्णा काळदाते यांनी सावित्रीबाई फुले व महावितरण महिला कर्मचाऱ्यांचा गुणगौरव केला तसेच दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी कनिष्ठ अभियंता प्राजक्ता बर्डे, संगीता यादव, वृषाली फाळके, सुरेखा जगताप, रूपाली सुर्यवंशी, राजश्री काकडे, राधाबाई दिवटे, प्रतिभा धुळे व इतर महिला कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होत्या.

# दरोडेखोरांनी एटीएम फोडले

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** शहरातील केशव नगर येथील भारतीय स्टेट बँकेचे एटीएम फोडून दरोडेखोरांच्या टोळीने १६ लाख ५४ हजारांची रोकड लंपास केली. ही घटना गुरुवारी पहाटे घडली. या घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शहरातील केशव नगर येथील रिंग रोडवर भारतीय स्टेट बँकेचे एटीएम आहे. या एटीएम केंद्रामध्ये कालच बँकेचे अधिकारी व खासगी एजन्सीमार्फत १६ लाखांची रोख रक्कम भरण्यात आली होती. दरोडेखोरांनी या एटीएम केंद्राला गुरुवारी पहाटे ३ वाजताच्या सुमारास लक्ष्य केले. तोंडाला फडके बांधून चारचाकी वाहनाने आलेल्या चार ते पाच दरोडेखोरांनी काही मिनिटांमध्ये एसबीआयचे एटीएम मशीन फोडले.






# कल्याण येथे भव्य राज्यस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनस्पर्शी साहित्य परिवार यांचे वतीने रविवार दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी पहिल्या राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे आयोजन कल्याण येथील सिद्धीविनायक गार्डन हॉल , बिर्ला रोड, भोईरवाडी या ठिकाणी करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रतिभावान व नवोदीत साहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या साहित्याला नवी ओळख मिळावी या उद्देशाने या साहित्य संमेलनाचे आयोजन होत आहे. "मनस्पर्शी साहित्य परिवार" हा व्हॉट्सॅप समूह २४ जुलै २०१९ रोजी काही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुरू केला आहे. गेली तीन वर्षे या समूहात लेखनाचे असंख्य उपक्रम राबवून साहित्यिकांच्या लेखणीला प्रोत्साहन देत मनस्पर्शी कार्यरत आहे. या समूहात दररोज दैनंदिन उपक्रमाअंतर्गत वेगवेगळे विषय दिले जातात व त्यावर मुक्तपणे आवडत्या लेखन प्रकारातून व्यक्त होण्याची संधी मिळते. समूहातर्फे विविध विषयांवर वेगवेगळ्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजनही केले जाते. सुरुवातीला अगदी ३ सदस्यांपासून सुरू केलेला हा समूह आज जवळपास ५००० सदस्यांच्या संपर्कात आला आहे. आजवरच्या ३ वर्षाच्या साहित्य सेवेत सक्रिय असताना या समूहाने २७ विशेष काव्य स्पर्धा,५ लेख स्पर्धा,३ कथा स्पर्धा,२ अलक स्पर्धा,१० ऑनलाईन काव्य संमेलन, एक गझल मुशायरा, आणि एक महास्पर्धा वेळोवेळी घेण्यात आल्या. यामधील विजेत्यांना रोख पारितोषिके व ऑनलाईन प्रमाणपत्रे देवून गौरविण्यात आले. त्यामुळे समूहाशी अनेक साहित्यिक जोडले गेले. मनस्पर्शी साहित्य परिवाराचे भव्य राज्य स्तरीय काव्य संमेलन दि. ८ जानेवारी, २०२३ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ पर्यंत चालणार आहे. या संमेलनाचे उद्‌घाटक - मा. दत्तात्रय शिंदे, स्वागताध्यक्ष कवयित्री प्रा. मानसी जोशी, संमेलनाचे प्रमुख वक्ते आनंद लेले हे असून मुख्य संमेलनाध्यक्ष म्हणून कवयित्री व लेखिका प्रा. प्रतिभा सराफ या उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी मान्यवर कवयित्री कल्पना गवारे, लेखिका राधिका भांडारकर ,अस्मिता पंडित हे असून मनस्पर्शीच्या कु. मानसी पंडित तसेच मा. प्रा. विजय काकडे हे व्याख्याते संमेलनात महत्वाचे स्थान भूषविणार आहेत. या संमेलनाचे सूत्रसंचालन मनस्पर्शी साहित्य समुहाचे प्रशासक व युवा कवी मा. निखील कोलते व समूहाच्या अध्यक्षा मानसी ताई पंडित करणार आहेत. या संमेलनास प्रायोजक म्हणून ठाणे येथील तन्वी हर्बल्स तर्फे डॉ. मानसी मेहेंदळे धामणकर यांनी खूप मोलाचे सहकार्य करून संमेलनासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी निखील कोलते, राजेश नागुलवार, जयश्री चौधरी, मधुरा कर्वे, सोनाली जगताप, जयश्री शेळके, संपदा देशपांडे, आनंद लेले यांनी कार्यकारणीचे सदस्य आपले अमूल्य योगदान देत आहेत. पहिल्याच पण भव्य दिव्य कवी संमेलनात प्रथम नावनोंदणी करणाऱ्या एकूण ३५ निमंत्रित कवींना संधी देण्यात आली आहे. त्या प्रत्येक सहभागी सर्व कवींना उपस्थित मान्यवरांचे हस्ते आकर्षक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.






# काव्यकुंज साहित्य समूह आयोजित "कोकण विभाग मर्यादित कवी संमेलन 2023" उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काव्यकुंज साहित्य समूह आयोजित "कोकण विभाग मर्यादित कवी संमेलन 2023"* मुंबई येथील माटुंगा विभागात अगदी आनंदाने आणि उत्साहात पार पडले. महाराष्ट्रातील कोकण विभागीय प्रांतातील नवोदित साहित्यिकांना उत्तेजना देण्यासाठी हे कवी संमेलन खास आयोजित करण्यात आले होते. "कोकणच्या कोहिनूर हिऱ्यांना" वास्तविक स्वरूपात पाहताना हा योगायोग नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्वांना मिळाला. सदर काव्य संमेलनात सर्व साहित्यिक सारस्वतांनी भिन्न-भिन्न विषयांवर तसेच वेगवेगळ्या काव्य प्रकारांवर आधारित आपल्या स्वरचित रचना सादर केल्यात. वर्षाच्या पहिल्याच दिवशी साहित्याच्या या अमूल्य मेजवानीचा आस्वाद घेण्याचा लाभ साहित्यिकांना आणि रसिका श्रोत्यांना मिळाला. यासोबतच सर्व साहित्यिक मान्यवरांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी काव्यकुंज समूहाने कोणतेही शुल्क आकारले नसून सर्व साहित्यिकांना निशुल्क प्रवेश दिला. सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या कोकण विभागीय प्रांतातून सर्व नवोदित साहित्यिक मान्यवरांनी विविध जिल्ह्यांचे प्रतिनिधित्व करत असताना आवर्जून हजेरी लावली आणि या कार्यक्रमाची शोभा वाढवली. सर्व नवोदित साहित्यिकांच्या रचना एवढ्या अप्रतिम होत्या की त्यांची स्तुती करण्यासाठीही शब्द अपुरे पडतील. प्रत्येक साहित्यिकांनी त्यांच्या रचनेतील शब्दालंकार एवढ्या सुरेख प्रमाणात मांडले होते की त्या रचनांचे एखाद्या स्पर्धेत जर सादरीकरण केले असते तर क्रमांक प्राप्त झाल्याशिवाय राहिला नसता. सर्व साहित्यिक मान्यवरांच्या कविता सुरेख होत्यात तसेच त्यांचे सादरीकरणही अप्रतिम होते. या काव्य संमेलनाचे अध्यक्ष मा.सागर डावल, समीक्षक मा.अश्विनी निवाते मॅडम आणि प्रमुख पाहुण्यांनी त्यांच्या मनोगतातून सर्व साहित्यिक सारस्वतांनामौलिक मार्गदर्शन करून अमूल्य उपदेश केले.

# अट्टल मोटारसायकल चोर अटकेत अर्धा डझन मोटारसायकल जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** गुहेशाखेने केलेल्या कारवाईत रेकॉर्डवरचा मोटारसायकल चोर ३ लाख १० हजार रु किमतीच्या अर्धा डझन मोटारसायकल सहित जेरबंद केला. प्रदीप बाबुराव जाधव (२४) रा. संजय नगर मुकुंदवाडी असे अटक आरोपीचे नाव आहे.

वरील प्रकरणात मुकुंदवाडीचे चार व सिडको औद्योगिक पोलीस ठाण्याचा एक गुन्हा गुन्हेशाखेने उघडकीस आणला वरील कारवाई पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कल्याण शेळके, पीएसआय अझर कुरेशी, पोलीस कर्मचारी राजेंद्र साळुंके, तात्याराव शिनगारे यांनी पार पाडली

# दादासाहेब गणोरकर मेमोरियल चषक व्हॉलीबॉल स्पर्धा पर्व दुसरे उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** व्ही. एल. सी. हॉलीबॉल ॲकॅडमी व भाजपा क्रीडा आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने दादासाहेब गणोरकर मेमोरियल चषक व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली. भाजपा विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष शिरीष बोराळकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास नंदकुमार उकडगावकर, समीर लोखंडे, डॉ. दयानंद कांबळे , एम. इ. पाटील, दहिवाल उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन अभिषेक गणोरकर लोकेश ठाकरे व सचिन अत्रि यांनी केले होते. 14 व 17 वर्षाखालील मुले व मुली या वयोगटांमध्ये एकूण 25 संघाचा सहभाग तो दिला गेला दर्जेदार व अनोख्या पद्धतीने बनवल्या गेलेल्या व्हॉलीबॉल मैदानावर या स्पर्धेत घेण्यात आल्या. बक्षीस वितरण हे लोकेश ठाकरे (अध्यक्ष संभाजी नगर स्पोर्ट्स फाउंडेशन) अभिषेक गणोरकर (सचिव संभाजीनगर स्पोर्ट्स फाउंडेशन) ऋषिकेश गणोरकर सायली गणोरकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेसाठी सहकार्य हे अमोल बडदाळे वैद्य अकॅडमीचे संचालक धनंजय वैद्य दिनेश ज्वेलर्स दत्ता सोनकांबळे प्रांजल सोनवणे अदिती बागुल अंकिता तुपे यांनी सुशील सर सहकार्य केले. पंच म्हणून - शुभम पंडित वेदांत हावळे प्रमोद जेठे यश मगरे अंकिता तुपे आदिती बागुल मधुरा ठाकूर प्रेम जाधव आर्यन उबाळे घोडके आदींनी पंच म्हणून काम पाहिले.

# नितीन दांडगे यांना सेवा गौरव पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** माणुसकी रुग्णसेवा समूह घाटी, यांच्या सहाव्या



वर्धापन दिनानिमित्त सु लक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आयोजित सेवा गौरव पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते. मौलाना अब्दुल कलाम संशोधन केंद्र येथे हा पुरस्कार पार पडला. या पुरस्काराचे उद्‌घाटन माननीय वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामेश्वर रेंगे यांच्या हस्ते करण्यात आले असून प्रमुख पाहुणे म्हणून भगवान महाराज जंजाळ होते प्रमुख उपस्थिती सिद्धार्थ सोनवणे , ज्युनिअर चार्ली चपीयन हे होते.

नितीन दांडगे (सामाजिक कार्यकर्ते) यांना हा सेवा गौरव पुरस्कार हा प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र होते. त्यांनी समाजामध्ये आरोग्य विषयक काम हे मोठ्या प्रमाणावर ते करत असतात निराधार व्यक्तींना आधार देण्याचे काम यांच्यामार्फत राबविले जाते रक्तदान शिबिरे घेऊन त्यांनी अनेकांचे प्राण वाचवले आहे यांचे सर्व स्तरावरून पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा वर्षाव त्यांच्यावर होत आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटनेच्या कार्यकारिणीत डॉ. अभिनय दरवडे

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र राज्य बालरोगतज्ञ संघटनेच्या ( इंडियन अकॅडमी ऑफ पीडियाट्रिक्स) राज्य कार्यकारिणी मंडळावर शहरातील सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. अभिनय भास्कर दरवडे यांची कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार डॉक्टर अभिनय दरवडे हे आता राज्य कार्यकारिणी मंडळावर उत्तर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ठाणे येथे नुकत्याच पार पडलेल्या पदग्रहण सोहळ्यात डॉ.अभिनय भास्कर दरवडे यांना कार्यकारिणी मंडळ सदस्य या पदाचा पदभार सोपविण्यात आला असून येत्या वर्षभरात लहान मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या, आहार विहार, एकाग्रता, बुध्यांक क्षमता, मोबाईलचे व्यसन, लसीकरण, शारीरिक आणि बौद्धिक वाढ या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आणि लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हे कार्यकारी मंडळ संशोधनपर, प्रबोधनात्मक पद्धतीने काम करणार आहे. त्याकरिता बालरोगतज्ञांच्या राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करणे,शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी आणि पालकांचे समुपदेशन करणे, प्रबोधन करणे



असे अनेक कार्यक्रम येत्या वर्षात त्या अंतर्गत राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. अभिनय दरवडे यांनी दिली. उत्तर महाराष्ट्रातून डॉ. अभिनय दरवडे यांना कार्यकारिणी मंडळात महत्त्वाचे पद मिळाल्याने सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे. धुळ्यातील देखील बालरोगतज्ञ संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी देखील केला सत्कार नुकतीच ठाणे येथे महाराष्ट्र राज्य बालरोगतज्ञ संघटनेच्या कार्यकारिणीत डॉ. अभिनय दरवडे यांची कार्यकारी मंडळ सदस्यपदी अभिनंदनास्पद निवड झाल्याने संघटनेच्या धुळे येथील पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शहरातील हॉटेल कृष्णाई येथे सत्कार करण्यात आला यावेळी महाराष्ट्र IIP चे प्रेसिडेंट डॉ. रमाकांत पाटील सर,IAP धुळे प्रेसिडेंट डॉ. विलास वाडीले सर, डॉ.प्रमोद कुलकर्णी, डॉ.सूचित तांबोली, डॉ. आनंद देशपांडे, डॉ.संजय जोशी, डॉ. नीता हाटकर मॅडम आदी डॉक्टर उपस्थित होते.

# चर्चवर हल्ला करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा: जोसेफ मलबारी



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** छत्तीसगड येथील नारायणपूर चर्चवर अमानुष हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय जनरल सेक्रेटरी जोसेफ मलबारी यांनी तीव्र शब्दात निषेध करून आक्रोश व्यक्त केला आहे.
आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली असून लवकरच या हल्ल्याच्या निषेधार्त धुळे जिल्हाधिकारी कार्यालयावर मुक मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे . ख्रिस्ती धर्म हा येशूख्रिस्ताचे मानव कल्याणाचे विचार घेऊन जगणारा धर्म आहे. चर्चमध्ये दर रविवारी विश्वशांतीची प्रार्थना केली जाते. अशावेळी दि २ रोजी नारायणपूर ( छत्तीसगड ) येथे मोठ्या जमावाने येऊन चर्चवर हल्ला केला. मदर मेरी आणि भगवान प्रभू येशू ख्रिस्त यांचा फोटो आणि पुतळे तोडण्यात आले. तेथील धर्मगुरूंना धमकावण्यात आले. याच्या समुदायावर निषेधार्थ लवकरच मूक मोर्चा काढण्यात येईल. अशा समाजकंटकांना तातडीने शिक्षा झालीच पाहिजे. शांती, क्षमा, दया, प्रेम शिकवणाऱ्या अशाप्रकारे भ्याड हल्ला करताना लाज वाटली पाहिजे.
तसेच या हल्लयात पोलीस अधिकाऱ्यांना देखिल मारहाण झाली , ही अत्यंत निंदनीय गोष्ट असल्याचेही जोसेफ मलबारी यांनी म्हटले आहे . ज्यानी हा निंदनीय प्रकार केला त्यांच्याविरुद्ध जर छत्तीसगड सरकारने त्वरित कारवाई नाही केली तर देशातील सर्व ख्रिश्चन बांधव केंद्र सरकारविरुद्ध आवाज उठवतील , असा इशाराही जोसेफ मलबारी यांनी दिला आहे . लवकरच धुळे जिल्ह्यातील ख्रिश्चन बांधव जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेणार असल्याचे त्यांनी घोषित केले आहे.



# बाबुळगाव उपसरपंचपदी सुमन जुळणेकर बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**
**धर्माबाद :** तालुक्यातील बाभुळगावातील सरपंचपद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव होते. थेट जनतेतून झालेल्या निवडणुकीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक बंडु पाटील मोरे यांची आई शांताबाई दत्तराम मोरे यांनी बाजी मारली होती. मात्र उपसरपंच कोण होणार? याविषयी सदस्यामध्ये उत्सुकता होती. मात्र सुमनबाई बालाजी जुळणेकर यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्याची बिनविरोध निवड झाली.

यावेळी धर्माबाद पंचायत समितीचे कृषी अधिकारी एम.टी. जाधव यांनी निवडणूक निरक्षण अधिकारी काम पाहिले तर सहाय्यक म्हणून तलाठी अष्टुरे डी. एस. ग्रामसेवक आर.व्ही. ढालकरी यांनी काम पाहिले.


नव निर्वाचित उपसरपंच सुमनबाई बालाजी जुळणेकर यांचे सरपंच शांताबाई मोरे, ग्रामपंचायत सदस्य-महादेव भद्रे, हनुमंत मोरे, बंडू पा. मोरे यांनी अभिनंदन केले. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक एस.ए. आडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल बी.एम. जाधव यांनी कडक बंदोबस्त ठेवला होता.

# घडामोडी समाजातील

आधुनिक केसरी



तळा-गाळतील घटकापर्यंत पोहचू बातम्या लागल्या, समाजातील प्रश्न, समस्या यांची चर्चा होऊ लागली, वर्तमानपत्र तत्कालीन प्रशासन कर्त्यांची व त्यांच्या कार्य पध्दतीची चर्चा होऊ लागली, लोककल्याणकारी उपक्रमाची माहिती येऊ लागली. त्याचप्रमाणे अन्याय, अत्याचाराच्या घटना वृत्तपत्रात येऊ लागल्या, लोकसंघटन, लोकचळवळ उभारणे, लोकशिक्षण, व लोकप्रबोधन अशा किती तरी विधायक व रचनात्मक कार्याची नोंद या वर्तमान पत्रात व्हायला लागली. याच काळात लोकहितवादी म्हणून ओळखले जाणारे गोपाळ हरी देशमुख यांनीही १८४८ते१८५० या दोन वर्षात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विषयावर १०८पत्रे "प्रभाकर"या वृत्तपत्रात प्रसिद्ध केली. ही पत्रे शातपत्रे म्हणून खूप गाजली, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीही १८८१या वर्षी "केसरी"नावाचे दैनिक वृत्तपत्र सुरू केले जे आजही चालू आहे. १८९६ साली देशात मोठा भयानक दुष्काळ होता. यासमयी ब्रिटिश सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आगरकरांनी खूप जळजळीत लेख लिहिला होता. मुंबई मध्ये नवाकाळ हे दैनिक १९२३ पासून कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांनी आरंभ केले. आचार्य।प्रल्हाद केशव अत्रे यांनी १९४०साली नवयुग साप्ताहिक व नंतर तुकाराम साप्ताहिक व जय हिंद सायं, दैनिक व नंतर१९५६साली दै,मराठा नावाचे वृत्तपत्र सुरू केले. या सर्वांनी अत्यंत प्रामाणिक व निःपक्षपाती पणे पत्रकारिता केली. आज मोठया प्रमाणत मोठी व छोटी वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, पक्षिके आपापल्या परीने समाज प्रबोधन ,जनकल्याणकारी योजना,सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक, क्रीडा,कृषी क्षेत्र माहिती वाचकपर्यंत पोहचवीत आहेत, बाळ शास्त्री जांभेकर यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्षेत्रातील वृत्ताला ही प्राधान्य दिले,त्यांची पत्रकारिता कोण्या एका क्षेत्रापूर्ती मर्यादित नव्हती, आकसपणांची, दुजाभावा तर त्यांची अजिबात नव्हती,आज त्यांच्या पत्रिकारितेला पुढे चालवायला हवे, पत्रकार निः पक्षपाती,निर्भींड, स्पष्ट असवा अशी अपेक्षा आहे हेच खरे अभिवादन बाळ शास्त्री जांभेकर यांना ठरेल.



**धोंडीराम ध राजपूत सेवानिवृत्त शिक्षण अधिकारी, लाडगांव रोड, वैजापूर जिल्हा औरंगाबाद. मो.नंबर.9421312244**

# लग्नात विषबाधा तिघे रुग्णालयात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मदनी चौकात झालेल्या लग्न समारंभात आलेल्या १० ते १५ जणांना विषबाधा झाली त्यापैकी तिघे रुग्णालयात ॲडमिट असून उर्वरीत लोकांना उपचारानंतर घरी सोडण्यात आले ॲडमिट नागरिकांची एमएलसी जिनसी पोलिसांना प्राप्त झाली आहे १० ते १२ जणांना रात्रीच उपचारानंतर घरी पाठवले. असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कादिर मौलाना यांच्या मुलाचा लग्न समारंभ होता त्यासाठी मदनी चौकात त्यांनी मांडव उभारला होता कार्यक्रम संपल्यानंतर रात्री १० ३० वा. वरील प्रकार घडला.



# पथ विक्रेत्यांना परिचय बोर्ड व संदेश पत्रक वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर परिषद वैजापूर मध्ये राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत फेरीवाला धोरण या घटका मध्ये पी एम स्वनिधी मध्ये ज्या लाभार्थ्यांनी आर्थिक लाभ घेतला आहे आशा ना नगर परिषद वैजापूर च्या सभागृहात नगराध्यक्षा शिल्पा परदेशी उपनगरध्यक्ष साबेर खान तसेच मुख्याधिकारी बी. यु. बिघोत व सर्व नगर परिषद वैजापूरचे सदस्य गट नेते दशरथ बनकर व गट नेते प्रकाश चव्हाण तसेच सर्व सदस्य नगर परिषद वैजापूर यांच्या हस्ते पथ विक्रेत्यांना परिचय बोर्ड चे वाटप करण्यात आले सोबत स. प्रकल्प अधिकारी सुनिल भाग्यवंत व समुदाय संघटक दिवाकर त्रिभुवन उपस्थित होते तसेच लाभार्थी संतोष प्रसाद मानशिंग राजपुत, नानासाहेब बोर्ड यांना परिचय बोर्ड चे वाटप करण्यात आले.

# प्र-कुलगुरू डॉ. बिसेन यांची 'दयानंद' च्या ऑनस्क्रीन मूल्यांकन केंद्रास भेट



आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या ऑनस्क्रीन मूल्यांकन केंद्रास मंगळवारी भेट दिली. या भेटीत जिल्हा मूल्यांकन अधिकारी (वाणिज्य शाखा) डॉ.बळीराम खटाळ यांनी डॉ.बिसेन यांना मूल्यांकन संदर्भात कामाची सविस्तर माहिती दिली. डॉ. बिसेन यांनी काम अतिशय उत्तम पध्दतीने पार पडत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयात लातूर जिल्ह्यातील वाणिज्य शाखेच्या तसेच बीसीए, बीसीएस, फार्मसी आदी शाखांच्या उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग सुरू असून, वाणिज्य शाखा मूल्यांकन आणि नियमनाचे कामही सुरू आहे. प्र-कुलगुरू डॉ.बिसेन यांनी लवकरात लवकर निकाल घोषित करता यावा या दृष्टीने काही महत्वपूर्ण सूचना केल्या. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार, जिल्हा मूल्यांकन केंद्र अधिकारी डॉ.बळीराम खटाळ, डॉ.साईनाथ उमाटे, डॉ.बालाजी कांबळे, डॉ.एस.व्ही. डोंगरे, डॉ.सतीश कुंडलवार, डॉ. व्ही.आर. वाघमारे, डॉ.पी.टी. पवार, डॉ.लक्ष्मीकांत सोनी, प्रा.दगडू शेख, प्रा.निखिल व्यास, प्रा.श्रावण बनसोडे, डॉ.सारिका दायमा, प्रा.योगेश शर्मा, प्रा.दीपक सूर्यवंशी, कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलूकर, वरीष्ठ लिपीक ज्ञानेंद्र कातपुरे, केतन गायकवाड, राजकुमार माने आदींची उपस्थिती होती. सदरील मूल्यांकन केंद्र प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम पध्दतीने काम करीत आहे.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# चला जाणूया शिवना नदीला या उपक्रमाचा शुभारंभ

## शिवना नदी का धो धो पानी, हम सब बच्चे हिंदुस्थानी घोषणांनी शिवना पात्र दणाणले

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** स्वातंत्र्यांच्या अमृतमहोत्सव अंतर्गत चला जाणूया नदीला उपक्रमातर्गत सरकारने गंगापूर तालुक्यातून जाणाऱ्या शिवना नदीचा समावेश या उपक्रमात झाल्याने कन्नड तालुक्यातील शिवनाचे उगमस्थान असलेल्या अंधानेर या गावातून 23 तारखेला या यात्रेचा शुभारंभ करण्यात आला होता आज गंगापूर तालुक्यातील सनव येथे उपविभागीय अधिकारी माणिकराव आहेरतहसीलदार सतीश सोनी यानी शिवनामाईचे कलश पूजन करून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली दिनवाडा, सणव व वैरागड येथे ही पदयात्रा पोहचल्यावर चला नदी जाणूया या उपक्रमाची माहिती दिली व प्रत्येक गावात ही यात्रा पोहचल्यावर नदी स्वच्छता व खोरे निहाय पोषणासाठी प्रतिज्ञा करण्यात आली यावेळी प्रत्येक गावातील शालेय विदयार्थ्यांनी हिरीरीने सहभाग घेऊन शिवना नदी का धो धो पाणी, हम सब बच्चे हिंदुस्थानी पाणी आडवा पाणी जिरवा या घोषणा दिल्या. दरम्यान यावेळी या प्रकल्पचे समन्वयक गोकुळ सुराशे, अव्वल कारकून, डी एस राजपूत, सरपंच शैलेंद्र गायकवाड, गणेश पाटील ठोंबरे, सतीश वाघ, वनविभागाचे वनरक्षक नारायण चाथे, वनमजूर किसन गवळी, तलाठी देविदास पावटेकर, ग्रामसेवक किशोर गव्हाणे, कृषी सहाय्यक श्रीमती भाकडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. बापुसाहेब चाटे, केंन्द्र प्रमुख संतोष जगताप, ग्रामपंचायत सदस्य गोकुळ शेजवळ, राजाराम वाघचौरे,रामदास गायके, योगिता ठोंबरे, कडुबाळ ठोंबरे, कैसर पटेल, पोलीस पाटील दिलीप सोनवणे, कांबळे,शंकर ठोंबरे,वाल्मिक ठोंबरे सत्तार पटेल, गणेश ठोंबरे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असल्याने राज्य सरकारने राज्यातील एकूण 75 नद्याचे संवर्धन करण्यासाठी व नदी अमृत्वाहिनी करण्यासाठी हा उपक्रम हाती घेतलेला आहे त्याचाच एक म्हणून या शिवना नदीच्या पात्रातून पायी यात्रेला सुरुवात करण्यात आलेली असून नदीला आपल्या संस्कृतीत आईचीं ऊपमा दिली जाते म्हणुन शिवनामाई पूर्ववत बारमाही वाहण्यासाठी हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला असून जनतेतने या उपक्रमात भाग घ्यावा असे आवाहन केले . **माणिकराव आहेर ( उपविभागीय अधिकारी )**

उपविभागीय अधिकारी माणिकराव आहेर व तहसीलदार सतीश सोनी यांच्यासह दिनवाड्याचे सरपंच शैलेंद्र गायकवाड, मा . सरपंच डॉ . गणेश ठोंबरे,यांच्यासह सणव,दिनवाडा,वैरागड,पर्यंत नदीपात्रातून पायी प्रवास केला व वैरागड येथे समारोप झाल्यावर वैरागडचे पोलीस पाटील यांच्या निवासस्थानी गावरान भोजनाचा आस्वाद घेतला .



# वैजापुरात गुरू गोविंदसिंग जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील गुरुद्वारा उत्सव समितीच्या वतीने गुरुवार दि.५/१/२०२३ रोजी गुरू गोविंदसिंघ जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली,सकाळीच गुरुद्वारात आ.रमेश पा.बोरनारे यांनी गुरुद्वारात गुरू गोविंदसिंघ यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. समितीने गुरू गोविंदसिंह यांच्या प्रतिमेची शहराच्या विविध भागातून प्रभात फेरी काढली. भजने गाऊन आदरंजली अर्पण केली. या समयी बलविंदरसिंग, सुमित पोथीवाल, नंदकुमार आहुजा, कपिल आहुजा, प्रीती कौर, दिलजीत खनिजो, जितो खनिजो, अमर आहुजा, दिनेश आहुजा, धोंडीरामसिंह राजपूत, बाबा साहेब जगताप, प्रभात फेरीत सहभागी झाले होते. यानिमित्ताने गुरुद्वारात पोथी वाचन, गुरू ग्यानसिग यांनी केले. नगर कीर्तन, महाप्रसाद व लंगरचे पण आयोजन करण्यात आले होते. या समयी शीख, सिंधी, पंजाबी, बंधू,भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रीतिकौर व दिलजीत खनिजो परिवाराने यात पुढाकार घेतला, आ. बोरनारे यांनी गुरुद्वार विकास साठी निधी देणार असल्याचे विशद केले.

# परमेश्वर विधीचे आचरण म्हणजे संन्यास; आचार्य महंत लोणारकरबाबा महानुभाव

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील शेंदुर्णी येथे दि.४/१/२०२३ बुधवार रोजी प.पु. मं.आचार्य श्री.लोणारकरबाबा महानुभाव जाळीचा देव अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषदेचे अध्यक्ष शेंदुर्णी येथे कार्यक्रमात बोलताना सांगितले की सर्व संगाचा परित्याग करून परमेश्वरास शरण जाणे, काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, दंभ या सहा पडरुपींचा त्याग करणे मान-अपमान, निंदा-स्तुती, लाभ हानी, यश - अपयश, सुख दुःख, जय पराजय या सर्व गोष्टी बाजूला ठेवून परमेश्वराने सांगितलेला विधी आचरणात आणणे, परमेश्वराची आज्ञा हेच आपले जीवन असे समजून वैराग्य कंठून जीवन जगणे म्हणजे संन्यास दीक्षा होय, असे प्रतिपादन अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषदेचे अध्यक्ष व आचार माळिका सोहळ्याचे प्रवाचक महंत लोणारकर बाबा महानुभाव यांनी केले. शेंदुर्णी येथील गोपाला मेगा सिटीत आचारमाळिका सोहळ्यात संन्यास दीक्षा विधी कार्यक्रमात ते बोलत होते. महंत कारंजकर बाबा महानुभाव (अमरावती) कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संन्यास दीक्षा अनुसरण हे स्वामीच्या तत्त्वज्ञानाला, आचाराला, विचाराला आहे बालसंन्यासी असो की प्रपंच करून आलेला संन्यासी सर्वस्वाचा त्याग करून दोघे संन्यास दीक्षा घेतात, ते दोघेही सारखेच असून तेथे कोणताही भेदाभेद नाही. परमेश्वराने सांगितलेल्या आचार धर्माचे ते पालन करतात, असे महंत कारंजकर बाबा महानुभाव यांनी यावेळी बोलताना सांगितले. महंत जालनापूरकर बाबा महानुभाव (नांदेड), महंत अनंतव्यास बाबा जावळे (कामळज) आदींनी या वेळी प्रबोधन केले, तसेच दीक्षार्थीतर्फे मनीषा खानसोळे हिने मनोगत व्यक्त केले. या वेळी वसंत हरकळ (बोरी),आनंदा पाटील तळयी, मंदाताई पंडीतकर, कमलबाई लासुरकर, सुशिला अंजणकर, मनीषा खानसोळे, यांनी प्रप्रंचाचा त्याग करून संन्यास दीक्षा स्वीकारली. गोविंद अग्रवाल शेंदुर्णी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.महंत काटे बाबा महानुभाव जाळीचा देव यांनी सूत्रसंचालन केले. तर महंत गोमेराज बाबा शहादा यांनी आभार मानले. यावेळी प.पु.मं. आचार्य पाथरीकरबाबा महानुभाव जाळीचा देव,प.मं. गोंविदभाऊ लोणारकर, विद्दाधर दादा महानुभाव, धनराज बाबा महानुभाव, प्रवीणदादा लोणारकर, गोपीनाथ पुजारी, गोकुळसिंग राजपूत सावळदबारा, आरुण पाटील लिहे दिगर, सुनील पाटील, अंबादास गोंधळी शेंदुर्णी व सतंमहंत, वासनिक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती प्रवीणदादा लोणारकर महानुभाव यांनी जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना दिली.

# सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेऊन मुली शिकल्या पाहिजे : प्रा.जीवन कोलते



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील शिवाजी विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. आठराव्या शतकामध्ये आशिया खंडामध्ये पहिली शाळा काढून ४ मुलींवर वर्ग सुरु करुन अनेक समस्यांवर मात करत कुणाचीही आर्थिक मदत न घेता १८ शाळा निर्माण करुन शिक्षणामध्ये क्रांती केल्या अशा या महान सावित्रीबाई जोतीबाराव फुले यांचा आदर्श घेऊन मुली शिकल्या पाहिजे असे प्रतिपादन प्रा.जीवन कोलते सामाजिक कार्यकर्ते यांनी केले. शिवाजी विद्यालयात सावळदबारा येथे रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता ज्ञानज्योती, राष्ट्रमाता, पहिल्या महिला शिक्षीका मुख्याध्यापिका सावित्रीबाई जोतीबाराव फुले यांची १९२ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, सावित्रीमाई फुले यांनी १८ व्या शतकात स्त्री व शुद्रांमध्ये शिक्षणाचा अभाव हे ध्येय उराशी बाळगून बाल विवाहाला विरोध, जातीभेद नष्ट करणे, विधवांचा पुनर्विवाह करणे, स्त्री- पुरुष समानता असे अनेक कार्य त्यांनी केले असून आपण सर्वांनीच त्यांचा आदर्श घेऊन कार्य करणे ही काळाची गरज असून भारत सरकारने त्यांना मरणोपरांत भारतरत्न पुरस्कार दिला पाहिजे अशीही मागणी त्यांनी यावेळी केली.अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील, सचिव सौ.रत्नाताई कोलते, अध्यक्ष भाऊराव पाटील, शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

